- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

सोने-चांदी
✔ २४ कॅरेट : १,५३,४१० /-
✔ २३ कॅरेट : १,५१,३५० /-
✔ चांदी : २,४४,३००/-

# दैनिक सिंहवाणी वृत्त

प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर | संचालक-संपादक : अजय बिवडे

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : रविवार, १३ सप्टेंबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २७४ | किंमत : २ रूपये

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

# जरांगे पाटलांची मुंबईत उपोषणाची घोषणा

## अजूनही वेळ गेलेली नाही, सरकारने जरांगेंशी चर्चा करावी : रोहित पवार

**वृत्तसंस्था, मुंबई**

मराठा आरक्षणाच्या मुद्यावरुन राज्यातील वातावरण चांगलच तापल्याचं पाहायला मिळत आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील हे गेल्या १५ दिवसापासून अंतरवाली सराटीत आमरण उपोषण करत आहेत. अशातच आता जरांगे पाटील यांनी मोठा निर्णय घेतला आहे. सर्व मराठा बांधवांसह जरांगे पाटील आता मुंबईच्या दिशेने जाणार आहेत. मुंबईतील आझाद मैदानावर ते उपोषण सुरु करणार आहेत.

याच मुद्यावर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. जरांगे पाटील यांच्या मुंबई आंदोलनापूर्वीच सरकारनं चर्चेतून मार्ग काढावा, असा सल्ला आमदार रोहित पवार यांनी दिला आहे.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईत आंदोलन करण्याची भूमिका जाहीर केली आहे. त्यामुळं सरकारसमोर पुन्हा एकदा मोठं आव्हान उभं राहिलं आहे. दरम्यान, लातूरमध्ये एमपीएससी विद्यार्थ्यांच्या आक्रोश मोर्चानंतर रोहित पवार प्रसारमाध्यमांशी बोलत होते. अजूनही वेळ गेलेली नाही. सरकारने आजच मनोज जरांगे पाटील यांची भेट घेऊन आपली भूमिका स्पष्ट करावी आणि चर्चेतून तोडगा काढावा, अशी मागणी रोहित पवार यांनी केली आहे. जरांगे पाटील मुंबईत आंदोलनासाठी गेल्यास



आंदोलकांसोबतच मुंबईतील सर्वसामान्य नागरिकांनाही अडचणींचा सामना करावा लागू शकतो. त्यामुळं परिस्थिती चिघळण्याआधीच सरकारने पुढाकार घेऊन चर्चा करावी, अशी भूमिका रोहित पवार यांनी मांडली आहे.

दरम्यान, उपोषणाच्या १५ व्या दिवशी मनोज जरांगे पाटील यांमी मुंबईला जाण्याची घोषणा केली. तर ३ सप्टेंबरला मुंबईतील आझाद मैदानावर पुढील उपोषणाचा लढा सुरु ठेवण्याचा निर्धार मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. दरम्यान या लढ्याला पाठिंबा दर्शवत अंतरवली सराटीतील उपस्थित महिला आंदोलकांनी मुंबईला सोबत येण्याची मागणी केली आहे.

यावर मनोज जरांगे पाटील यांनी आझाद मैदानावर येण्या ऐवजी सर्व महिलांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पत्नी लता शिंदे यांच्या घरी हळदी-कुंकू घेऊन जाण्याचा सल्ला दिला आहे. सौभाग्यचं लेणं असलेलं कुंकू घेऊन जर महिला आल्या असल्या आणि मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांच्या पत्नी ते स्विकारणार नसतील तर ते कसले हिंदू? असा खोचक सवालही मनोज जरांगे पाटील यांनी उपस्थित केला आहे.

## थोडक्यात

### जम्मू -काश्मीरमध्ये दहशतवादी कट

**श्रीनगर** : राष्ट्रीय तपास संस्थेने एका दहशतवादी कटाच्या प्रकरणात शनिवारी सकाळी जम्मू आणि काश्मीरच्या अनेक भागांमध्ये मोठी छापेमारी केली. सुरक्षा दलांनी कुलगाम, गांदरबल आणि बांदीपोरासह खोऱ्यातील एकूण सात ठिकाणी शोधमोहीम राबवली आहे. पाकिस्तानस्थित दहशतवादी सूत्रधार आणि स्थानिक भूमिगत कार्यकर्त्यांच्या नेटवर्कशी संबंधित प्रकरणाचा तपास करण्यासाठी ही कारवाई हाती घेण्यात आली असून, एनआयएच्या पथकांनी कुलगाममध्ये दोन, बांदीपोरामध्ये तीन आणि सोपोरमध्ये दोन ठिकाणी झाडाझडती घेतली. स्थानिक पोलीस आणि सुरक्षा दलांनी या शोधमोहिमेदरम्यान एनआयएच्या पथकांना पूर्ण सहकार्य केले असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे.

तपास यंत्रणेला संशय आहे की, पाकिस्तानस्थित दहशतवादी सूत्रधारांच्या इशाऱ्यावर काम करणाऱ्या स्थानिक नेटवर्कने खोऱ्यात घुसखोरी करणाऱ्या दहशतवाद्यांना रसद (लॉजिस्टिक्स) आणि इतर प्रकारची मदत पुरवली होती. मूळात हे प्रकरण श्रीनगरमधील जकुरा पोलीस ठाण्यात नोंदवण्यात आलेल्या एफआयआरशी संबंधित आहे. त्यानंतर एनआयएने हे प्रकरण जेएमयूके म्हणून पुन्हा नोंदवून आपल्या हातात घेतले. या प्रकरणात बेकायदेशीर कृत्ये (प्रतिबंध) कायदा, १९६७ च्या कलम २३, शस्त्र कायदा, १९५९ च्या कलम ७ आणि २५ तसेच स्फोटक पदार्थ कायदा, १९०८ च्या कलम ४ अंतर्गत कायदेशीर कारवाई केली जात आहे.

# वाळू लिलाव प्रक्रिया अधिक पारदर्शक

## तालुकानिहाय एकत्र लिलाव, तीन फेऱ्यांचे नियम, ई-लिलावासोबत ई-निविदा पद्धत बंधनकारक, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केल्या नवीन मार्गदर्शक सूचना जारी

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**

राज्यातील वाळू व रेती घाटांच्या लिलाव प्रक्रियेमध्ये सुसूत्रता, पारदर्शकता आणण्यासाठी आणि अनधिकृत उत्खननाला आळा घालण्यासाठी महसूल विभागाने वाळू/रेती निर्गती धोरण-२०२५ मध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या आहेत. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी याबाबत पुढाकार घेऊन हे धोरण मार्गी लावले आहे.

यासंदर्भातील नवीन शासन निर्णय अधिकृतपणे जारी करण्यात आला आहे. नवीन नियमांनुसार, आता वाळू घाटांचा लिलाव विहित मुदतीत पार पाडण्यासाठी स्पष्ट वेळापत्रक, बोली फेऱ्यांचे निकष आणि ई-लिलावासोबत



ई-निविदा पद्धतीचा अवलंब करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

यापूर्वीच्या धोरणात वाळू लिलावाच्या दुसऱ्या व तिसऱ्या फेरीसाठीची कालमयार्दा आणि आवश्यक निविदाधारकांची संख्या याबाबत स्पष्टता नव्हती. यामुळे विविध जिल्ह्यांमध्ये लिलावासाठी वेगवेगळ्या पद्धती वापरल्या जात होत्या, ज्यामुळे लिलाव प्रक्रियेत विलंब होऊन शासनाच्या महसुलाचे नुकसान होत होते. यावर तोडगा काढण्यासाठी शासनाने हे सुधारित धोरण लागू केले आहे.

नवीन नियमांनुसार, नदीपात्रातील पर्यावरण परवानगी मिळालेल्या सर्व वाळूघाटांचा प्रथम तालुकानिहाय एकत्र लिलाव केला जाईल. लिलावासाठी तीन फेऱ्यांची प्रक्रिया निश्चित करण्यात आली असून प्रथम फेरीत किमान तीन, दुसऱ्या फेरीत किमान दोन आणि तिसऱ्या फेरीत किमान एक पात्र निविदाधारक असणे आवश्यक राहील. तीनही फेऱ्यांनंतरही लिलाव न झाल्यास हे वाळू गट स्थानिक वापरासाठी राखीव ठेवले जातील.

तसेच, सर्वोच्च बोली बोलणाऱ्या निविदाधारकाने उर्वरित रक्कम विहित मुदतीत न भरल्यास, अनुक्रमे H-2 आणि H-3 निविदाधारकांना त्याच दराने संधी दिली जाईल. लिलाव प्रक्रियेदरम्यान तांत्रिक तपासणीत अपूर्ण कागदपत्रे राहिलेल्या स्पर्धकांना महाटेंडर पोर्टलवर कागदपत्रे अपलोड करण्यासाठी १ दिवसाची अतिरिक्त संधी दिली जाणार आहे.

यापूर्वीचे वाळू धोरणातील सर्वसाधारण वेळापत्रक रद्द करण्यात आले असून जिल्हाधिकाऱ्यांना कालबद्ध नियोजन करून विहित वेळेत कायदेशीर कार्यवाही पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत.

# गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पुण्यात बनावट खवा, पनीर जप्त

**वृत्तसंस्था, पुणे**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासनाने शुक्रवारी (दि. ११) भेसळयुक्त खवा, पनीर आणि दुग्धजन्य पदार्थ जप्त करत बुधवार पेठ आणि शुक्रवार पेठ परिसरात धडक कारवाई केली. सकाळी साडेसहापासून सुरू झालेल्या या मोहिमेत तब्बल ४ हजार ६०० किलो खवा आणि १२ हजार ५०० किलो पनीर तपासणीसाठी ताब्यात घेण्यात आले. या कारवाईत सुमारे ३८ लाख रुपयांच्या संशयित साठ्यावर कारवाई करण्यात आली. बाहेरील राज्यांतून शहरात येणाऱ्या दुग्धजन्य पदार्थांच्या साठ्यावर एफडीएने लक्ष केंद्रित केले आहे. शुक्रवारी पहाटेपासूनच कर्नाटकातून पनीरचे ट्रक शहरात दाखल होत असताना अधिकाऱ्यांनी बुधवार पेठ परिसरात तपासणी सुरू केली.

दुकानांमध्ये वितरित होण्यापूर्वीच संशयित माल ताब्यात घेण्यात आला. बार्शी येथून पुण्यात आणलेला सुमारे ४ हजार ६०० किलो खवा तसेच कर्नाटकातून आलेले मोठ्या प्रमाणातील पनीर ताब्यात घेण्यात आले. कारवाईत एफडीएचे सुमारे १२ ते १३ अधिकारी सहभागी झाले होते. संशयित साठ्यांचे नमुने घेऊन ते प्रयोगशाळेच्या तपासणीसाठी पाठविण्यात येणार आहेत. ही कारवाई एफडीएच्या मुंबई मुख्यालयाच्या निदेर्शानुसार करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर राज्यभर दुग्धजन्य पदार्थांच्या तपासणीची मोहीम हाती घेण्यात आली आहे.

**शहरात रोज राज्याबाहेरून २० ते २५ टन पनीर**

शहराच्या बाजारपेठेत दररोज अंदाजे २० ते २५ टन पनीर कर्नाटकातून येत असल्याचे डेअरी व्यावसायिक सांगतात. गेल्या सुमारे ४० वर्षांपासून कर्नाटकातील बागलकोट परिसरातून पुण्यात पनीरचा पुरवठा होत आहे. मात्र, एफडीएच्या अलीकडील धडक कारवायांमुळे या भागातून शहरात येणा-या मालाचे प्रमाण ४० ते ५० टक्क्यांनी घटल्याचा दावा काही व्यावसायिकांनी केला आहे.

# १२ राज्यांत मुसळधार पावसाचा अंदाज

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

अल निनोचा प्रभाव संपूर्ण देशात दिसून येत आहे. देशातील अनेक राज्यांमध्ये समाधानकारक पाऊस झालेला नाही. अनेक भागातील पावसाची तूट वाढताना पाहायला मिळत आहे. याचा परिणाम जलसाठ्यांवर झालेला दिसत आहे. पाऊस कमी झाल्याने अनेक धरणे पूर्ण क्षमतेने भरलेली नाहीत. शेतकरी बांधवही संकटात आहेत. अशातच देशातील अनेक राज्यांमध्ये मुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.हवामान विभागाच्या अंदाजानुसार, बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र तयार झाले असून पुढील ३ दिवसांत हे क्षेत्र ओडिशापासून गुजरातपर्यंत पुढे सरकण्याचा अंदाज आहे.

१२ सप्टेंबर २०२६ रोजी दिल्ली, उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थान, मध्य प्रदेश, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, हरियाणा, पंजाब, जम्मू आणि काश्मीर, झारखंड, पश्चिम बंगाल, ओडिशा, छत्तीसगड, आसाम, महाराष्ट्र, गुजरात, तेलंगणा, केरळ, त्रिपुरा आणि नागालँड या



राज्यांमध्ये मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. या काळात वादळी वारे वाहतील, अशी शक्यता वर्तवण्यात आली आहे.

१२ सप्टेंबर रोजी उत्तर कोकण, उत्तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाडा, विदर्भात बहुतेक ठिकाणी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. १३ सप्टेंबर रोजी संपूर्ण राज्यात बहुतेक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. १४ सप्टेंबर आणि १५ सप्टेंबर रोजी कोकणात बहुतांश ठिकाणी पावसाची शक्यता असून, १२ सप्टेंबर रोजी दक्षिण कोकण आणि दक्षिण मध्य महाराष्ट्रातील ४ जिल्हे वगळता संपूर्ण राज्यासाठी पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे. १३ सप्टेंबर रोजी उत्तर कोकण, उत्तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील काही जिल्ह्यांत येलो अलर्ट देण्यात आला असून नंदुरबार आणि नाशिक जिल्ह्यांसाठी १३ सप्टेंबर रोजी ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.

दरम्यान, यंदा राज्यात पावसाचे प्रमाण असमान आहे. अनेक भागात पावसाची तूट कायम आहे. सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात काही भागात हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला असला तरी बहुतांश भाग कोरडे होते. पुढील दोन दिवसांत हवामान प्रणालीच्या सक्रियतेमुळे हवामान विभागाने राज्यात सर्वदूर पावसाची शक्यता वर्तवली आहे. काही भागात मुसळधार पावसाची, तर काही भागात वादळी पावसाची शक्यता आहे.

# ज्येष्ठ काँग्रेस नेते डॉ. रत्नाकर महाजन काळाच्या पडद्याआड



**पुणे** : काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी प्रवक्ते रत्नाकर महाजन यांचे आज शनिवारी (१२ सप्टेंबर) सकाळी पुण्यातील राहत्या घरी निधन झाले. ते ८० वर्षांचे होते. गेल्या काही दिवसांपासून ते आजारी होते. आजारपणामुळे त्यांच्यावर राहत्या घरीच उपचार सुरू होते. आज सकाळी राहत्या घरीच त्यांची प्राणज्योत मालवली. महाजन यांची अभ्यासू, संयमी आणि निष्ठावंत नेता अशी ओळख होती. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते म्हणून त्यांनी पक्षाच्या विविध जबाबदाऱ्या सांभाळल्या होत्या. त्यांच्यावर आज दुपारी पुण्यातील वैकुंठ स्मशानभूमीत त्यांच्यावर अन्त्यसंस्कार करण्यात येणार आहेत. डॉ. रत्नाकर महाजन यांचा जन्म १४ जून १९४६ रोजी इंदापूर येथे झाला होता. त्यांचे प्राथमिक शिक्षण इंदापूरमध्येच झाले. उच्च शिक्षणासाठी ते पुण्यात आले आणि त्यानंतर पुण्यातच स्थायिक झाले. व्यवसायाने डॉक्टर असलेल्या महाजन यांनी समाजवादी विचारसरणीने प्रेरित होऊन सामाजिक क्षेत्रात काम करण्यास सुरुवात केली. आणीबाणीच्या काळात त्यांना तुरुंगवासही भोगावा लागला.

# बाजारात लिंबांचा तुटवडा, एक लिंबू दहा रुपयांना

**वृत्तसंस्था, पुणे**

वेळेपूर्वीच उन्हाळ्यात लिंबाची मोठ्या प्रमाणावर तोड करून शेतकऱ्यांनी बाजारात लिंबं विक्रीस पाठविली. त्यामुळे ऐन पावसाळ्यात घाऊक बाजारात लिंबाचा मोठ्या प्रमाणावर तुटवडा जाणवत आहे. पावसाळ्यात लिंबाचा दर कमी असतो. मात्र, तुटवडा जाणवत असल्याने लिंबाचा दर वाढला आहे. किरकोळ बाजारात एका लिंबासाठी १० रुपये मोजावे लागत असून, ४० ते ५० रुपयांत सहा लिंबांची विक्री केली जात आहे.

पावसाळ्यात लिंबाला फारशी मागणी नसते, तसेच दरही कमी असतो. लिंबाला सर्वाधिक मागणी उन्हाळ्यात असते.



उन्हाळ्यात घरगुती ग्राहक, सरबतविक्रेते, रसवंती गृहचालकांकडून मागणी वाढल्यानंतर बाजारात लिंबाचा तुटवडा जाणवतो. उन्हाळ्यात शेवटच्या टप्प्यात लिंबाची लागवड केली जाते. ती लिंबं जुलै-ऑगस्टमध्ये काढणीस येतात. मात्र, यंदा लिंबूउत्पादकांनी कच्च्या लिंबाची तोड केली. त्यामुळे बाजारात सध्या लिंबाचा तुटवडा जाणवत आहे.

रविवारी (७ सप्टेंबर) मार्केट यार्डातील फळबाजारात सोलापूर, अहिल्यानगर जिल्ह्यातून हजार ते १२०० गोणी लिंबाची आवक झाली. एका गोणीत आकारमानानुसार ३०० ते ४०० लिंबे असतात. श्रावण महिन्यात सामिष पदार्थ वर्ज्य केले जातात. त्यामुळे लिंबाला मागणी कमी असते. गणेशोत्सवात हॉटेल व्यावसायिकांकडून लिंबाला मागणी वाढेल. सध्या बाजारात मागणीच्या तुलनेत लिंबाची आवक कमी असल्याने दरवाढ झाली, असे त्यांनी नमूद केले.

**दरवाढीची झळ लोणचे उत्पादकांना**

जुलै- ऑगस्ट, नोव्हेंबर-डिसेंबर महिन्यात लिंबाला मागणी कमी असते. लिंबाचा दर कमी असतो. त्यामुळे लोणचे उत्पादक थंडीत, पावसाळ्यात लिंबूखरेदी करतात. यंदा पावसाळ्यातही लिंबू महागल्याने त्याची झळ लोणचे उत्पादकांना बसली आहे.

# विराट कोहली-एकनाथ शिंदेंची थेट लंडनमध्ये भेट

**वृत्तसंस्था, मुंबई**

दिग्गज भारतीय क्रिकेटपटू विराट कोहली सध्या आपला बहुतेक वेळ लंडनमध्ये घालवतो. जेव्हा जेव्हा तो भारताला भेट देतो, तेव्हा त्याच्याबाबत अनेक चर्चा रंगतात. तो आता लवकरच भारतात परतणार असून वेस्ट इंडिजविरुद्धच्या आगामी मालिकेत भारतीय संघाकडून खेळणार आहे. दरम्यान, राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे एका कार्यक्रमासाठी लंडनमध्ये होते, जिथे दोघांची भेट झाली.

एकनाथ शिंदे यांनी कोहलीला शाल देऊन सन्मानित केले आणि त्यांनी विविध विषयांवर चर्चा केली.विराटची भेट घेतल्यानंतर उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, विराट कोहली खूप साधेपणाने वागतो. कोहलीचे



कौतुक करताना शिंदेंनी म्हटले, तो एक महान क्रिकेटपटू असूनही खूप साधेपणाने वागतो. त्यांनी स्पष्ट केले की ते कोहलीला यापूवीर्ही भेटले आहेत, पण यावेळी थेट संवाद झाला. तसेच दोघांनी महाराष्ट्रातील विविध कल्याणकारी योजनांवर चर्चा केली. याशिवाय कोहलीला पायाभूत सुविधांबद्दलही माहिती दिल्याचे एकनाथ शिंदेंनी सांगितले.

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे गुरुवारी लंडन येथे दाखल झाले. एका सांस्कृतिक कार्यक्रमात महाराष्ट्र मंडळातर्फे त्यांना 'ग्लोबल प्राईड ऑफ महाराष्ट्र' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमादरम्यान शिंदे म्हणाले की, येत्या काळात लंडनमध्ये आंतरराष्ट्रीय मराठी साहित्य महोत्सव आयोजित केला पाहिजे. यापूर्वी, शिंदे यांनी भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली वाहण्यासाठी लंडनमधील त्यांच्या निवासस्थानी भेट दिली होती.

विराट कोहलीने कसोटी आणि टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे. तो सध्या फक्त वनडे सामने खेळतो. वेस्ट इंडिजचा संघ सप्टेंबरच्या अखेरीस भारतात येत असून, यादरम्यान तीन वनडे सामने खेळले जातील. या मालिकेसाठी भारतीय संघाची अद्याप घोषणा झाली नसली तरी, संघात त्याचा समावेश होण्याची शक्यता आहे. त्यामुळे कोहली लवकरच भारतात दाखल होईल. मालिकेतील पहिला सामना २७ सप्टेंबर रोजी तिरुवनंतपुरम येथे खेळला जाईल. त्या दिवशी कोहली क्रिकेटच्या मैदानावर दिसणार आहे.

संपादकीय लेखणीतून...

# हिंदी भाषा : ओळख आणि संस्कृतीचा अविभाज्य भाग

भारत देशात सर्वत्र हिंदी दिवस दरवर्षी १४ सप्टेंबरला साजरा केला जातो. सन १९४९ साली भारताच्या राज्यघटनेत हिंदी भाषेला राजभाषेचा दर्जा देण्यात आला आणि या ऐतिहासिक घटनेची आठवण म्हणून हिंदी दिवस साजरा केला जातो. हिंदी भाषा आपल्या देशातील सर्वात मोठ्या आणि लोकप्रिय भाषांपैकी एक आहे. भारतातील अनेक राज्यांमध्ये हिंदी ही प्रमुख भाषा म्हणून ओळखली जाते आणि ती लाखो लोकांची संवाद साधण्याचे माध्यम आहे. हिंदी दिवस आपल्याला आपल्या भाषिक वारशाचे स्मरण करून देतो आणि आपल्याला तिच्या संवर्धनाची जबाबदारी घेण्यास प्रवृत्त करतो. हिंदी ही आपल्या ओळखीचा आणि संस्कृतीचा एक अविभाज्य भाग आहे. तिच्या समृद्धी आणि प्रसारासाठी, तसेच भारतातील विविधता एकत्रित करण्यासाठी, हिंदीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. हिंदी दिवस आपल्याला या सर्व गोष्टींची जाणीव करून देतो.

हिन्दी क्षेत्रः हिंदी ही भारत देशामधील सर्वाधिक वापरली जाणारी भाषा आहे. हिंद-आर्य भाषासमूहामधील हिंदुस्तानी भाषेच्या संस्कृतीकरणामधून हिंदीचा उदय झाला. भारताच्या उत्तर भागातील आणि मध्य प्रदेशातील लोकांची ती मातृभाषा आहे. सध्या भारताच्या दिल्ली, उत्तर प्रदेश, हरयाणा, बिहार, झारखंड, मध्य प्रदेश, छत्तीसगड व राजस्थान या राज्यांमध्ये बहुसंख्य हिंदी भाषिक आहेत. इंग्रजीबरोबरच हिंदी ही भारत सरकारच्या कामकाजाची भाषा आहे अनेकजण हिंदीला राष्ट्रभाषा असे समजतात, परंतु हिंदी ही राष्ट्रभाषा नाही. भारतीय राज्यघटनेनुसार सर्व २२ भाषा अधिकृत आहेत. आपला देश समानतेला महत्त्व देतो. त्यामुळेच सर्व भाषा समान आहेत. हिंदी ही राष्ट्रभाषा नाही. हिंदीला देवनागरी लिपीमध्ये लिहीतात. सन २०११ च्या भारताच्या जनगणनेनुसार, हिंदी ही भारतातील सर्वात वेगाने वाढणारी भाषा आहे, त्यानंतर दुसऱ्या स्थानावर काश्मिरी, मेईटी (अधिकृतपणे मणिपुरी म्हणतात) तसेच गुजराती, तिसऱ्या स्थानावर आणि बंगाली चौथ्या स्थानावर आहे.

जगातील सुमारे ५० कोटी लोक हिंदी समजू किंवा बोलू शकतात. भारतातील सर्वात जास्त खप आणि आवृत्त्या असलेली वर्तमानपत्रे हिंदी भाषेत प्रसिद्ध होतात. हिंदी चित्रपट भारतातच नाही तर जगभर पाहिले जातात. हिंदी चित्रपटसंगीत सर्वत्र लोकप्रिय आहे. चिनी आणि इंग्रजीच्या पाठोपाठ हिंदी ही जगातली सर्वात जास्त बोलली जाणारी भाषा आहे. आंतरजालावर वापरलेल्या भाषांतल्या पहिल्या दहात हिंदी आहे. जिच्यातले अधिकाधिक साहित्य अन्य जागतिक भाषांत अनुवादित होते, अशा पहिल्या विसात हिंदी आहे. भारतात अन्य भाषांत हिंदीतल्या अनेक शब्दांचा शिरकाव झाला आहे आणि त्या भाषांच्या व्याकरणावर हिंदीचा प्रभाव जाणवू लागला आहे. भारतीय घटनेतील कलम ३५१ अनुसार हिंदी भाषेचा विकास करण्याची जबाबदारी केंद्र सरकारची आहे. आठव्या अनुसूचीतील अन्य २१ भारतीय भाषा व जगातील इतर सर्व भाषांच्या प्रचलित शब्द संग्रहाचा अंगिकार करून हिंदी भाषेचा विकास करण्याचे आदेश घटनेत दिले आहेत. मॉरिशसमध्ये भारत सरकारच्या अनुदानाने आंतरराष्ट्रीय हिंदी सचिवालय स्थापित झाले आहे. जगातील पहिले हिंदी विद्यापीठ भारत सरकारने महाराष्ट्रात वर्धा येथे "महात्मा गांधी हिंदी विश्वविद्यालय" या नावाने स्थापन केले आहे. केवळ भारत नव्हे तर बऱ्याच देशांमध्येही बोलली जाते हिंदी भाषा. भारतात राहणाऱ्या बहुतांश लोकांना वाटतं की हिंदी भाषा फक्त आपल्याच देशात बोलली जाते. पण ही भाषा इतर काही देशांमध्येही बोलली जाते, हे तुम्हाला माहीत आहे का? हिंदी ही भाषा भलेही भारतात सर्वात जास्त बोलली जात असेल, पण जगात इतरही काही देश आहेत, जिथे या भाषेचा वापर केला जातो. काही देशांमध्ये तर या भाषेला अधिकारिक भाषेचा म्हणजेच राजभाषेचा दजार्ही देण्यात आला आहे. नेपाळ, फिजी, सिंगापूर, मॉरीशस यारखी अनेक ठिकाणे आपण फिरण्यासाठी जातो. या जागा विविधतेने, सौंदयार्ने नटलेल्या आहेत. दरवर्षी हजारो पर्यटक येथे येतात. मागील अनेक वर्षांपासून मोठ्या प्रमाणात भारतीय येथे राहतात. त्यामुळे हिंदी भाषेचा मोठा वापर तेथे होत असतो.

१) नेपाळः डोंगर, दऱ्या आणि सौंदर्याने नटलेल्या नेपाळमध्ये बहुतांश भागात हिंदी भाषा बोलली जाते. जरी इथली राजभाषा ही नेपाळी असली, तरीही देशातील अनेक भागात लोक हिंदी भाषेतच संवाद साधतात. २) फिजी : फिजी हा त्या देशांपैकी एक आहे, जिथे हिंदी भाषेला राजभाषेचा दर्ज देण्यात आला आहे. हे दक्षिण महासागरातील मेलोनेशियातील एक बेट आहे, जेथे लोक हिंदी बोलतात. ब्रिटिश राजवटीची झळ सोसणाऱ्या या देशाचे भारतीयांशी चांगले संबंध आहेत. ३) सिंगापूरः आपल्यापैकी अनेक जण सिंगापूरला फिरायला गेले असतील. तेथील नयनरम्य दृश्य, विविधता, सौंदर्य पाहून अनेकांना आनंद झाला असेल. असे मानले जाते, की सिंगापूर जवळजवळ ५०० वर्षांपासून ग्रेटर इंडियाचा एक भाग आहे आणि म्हणूनच भारतीय समुदायातील लोक मोठ्या संख्येने येथे वास्तव्यात आहेत. येथे तमिळ भाषेला राजभाषेचा दर्जा प्राप्त झाला आहे. प्रवासाच्या दृष्टीनेही हा देश एक उत्तम पर्यटनस्थळ मानला जातो. ४) मॉरीशसः भारतीयांसाठी हे ठिकाण एक उत्तम पर्यटनस्थळ आहे. येथील हिंदी भाषेच्या चलनामुळे भारतीयांना येथे येणे आवडते. या देशात अनेक सुंदर पर्यटनस्थळे आहेत आणि येथील बहुतेक लोक इंग्रजी बोलतात. मात्र क्रिओल ही या देशाची मूळ भाषा आहे.

हिंदी ही भारतातील एक महत्त्वाची आणि सर्वाधिक बोलली जाणारी हिंदी भाषा आहे. हिंदी भाषा देवनागरी लिपीमध्ये लिहिली जाते. या भाषेचा उगम संस्कृत भाषेतून झाला आहे. भारतीय संविधाने हिंदीला राजभाषा- अधिकृत कामकाजाची भाषा म्हणून स्वीकारले आहे. ही भारताची राष्ट्रभाषा नाही. परंतू भारतातील सुमारे ५० कोटी लोक हिंदी बोलतात आणि समजतात. जगातील ही एक प्रमुख भाषा आहे. दरवर्षी १४ सप्टेंबर हा दिवस देशात "हिंदी दिन" म्हणून साजरा केला जातो.




# बदलती जागतिक समीकरणे: १८ वी ब्रिक्स परिषद आणि भारताची भूमिका

**प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल**
**वर्धा**

आंतरराष्ट्रीय संबंधांच्या इतिहासात असे काही क्षण येतात, जे जगाच्या राजकीय आणि आर्थिक प्रवाहाला नवी दिशा देण्याचे काम करतात. नवी दिल्लीतील भव्य 'भारत मंडपम' येथे १२ आणि १३ सप्टेंबर २०२६ रोजी संपन्न होत असलेली १८ वी ब्रिक्स शिखर परिषद नेमकी याच ऐतिहासिक वळणावर उभी आहे. जागतिक व्यवस्थेचे केंद्र पश्चिमेकडून पूर्वेकडे सरकत असताना, युक्रेनमधील प्रदीर्घ युद्ध, अमेरिका-चीन यांच्यातील तीव्र व्यापारी व सामरिक स्पर्धा, पश्चिम आशियातील वाढता संघर्ष आणि 'ग्लोबल साउथ'चा म्हणजेच विकसनशील राष्ट्रांचा आक्रमकपणे वाढणारा प्रभाव या पार्श्वभूमीवर भारताकडे आलेले यजमानपद अनन्यसाधारण ठरते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आयोजित या परिषदेचे मूळ सूत्र 'लवचिकता, नाविन्य, सहकार्य आणि शाश्वतता' असे निश्चित करण्यात आले असून, निव्वळ आर्थिक आकडेमोडीपलीकडे जाऊन मानवतेला आणि सर्वसमावेशकतेला प्राधान्य देणारा दृष्टिकोन भारताने जागतिक पटलावर ठळकपणे मांडला आहे.

या शिखर परिषदेचे सर्वात लक्षवेधी आणि सामरिक दृष्ट्या संवेदनशील वैशिष्ट्य म्हणजे जगातील बड्या महासत्तांच्या प्रमुखांची प्रत्यक्ष उपस्थिती. रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्यासह ब्रिक्सच्या विस्तारित सदस्य राष्ट्रांचे सर्वोच्च नेते राजधानी दिल्लीत दाखल झाले आहेत. गलवान खोऱ्यातील भीषण लष्करी संघर्षानंतर दोन्ही देशांमधील संबंध कमालीचे ताणले गेले होते. त्या पार्श्वभूमीवर तब्बल सात वर्षांनंतर शी जिनपिंग हे भारतीय भूमीवर पाऊल ठेवत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि शी जिनपिंग यांच्यात प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरील शांतता, सीमाभागातील लष्कराची माघार, सामरिक समतोल आणि दोन्ही देशांतील आर्थिक व व्यापारी संबंधांविषयी होणारी संभाव्य द्विपक्षीय चर्चा आशिया खंडाच्या सुरक्षेच्या दृष्टीने निर्णायक मानली जात आहे. दुसरीकडे, रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्या उपस्थितीने भारत-रशिया यांच्यातील ऐतिहासिक मैत्रीचे नवे पर्व सुरू झाले आहे.

या दौऱ्यात पुतिन हे ब्रिक्स व्यापारी परिषदेला संबोधित करणार असून, उभय देशांमधील चर्चेत भारताला उर्वरित एस-चारशे हवाई संरक्षण क्षेपणास्त्र प्रणालीचा पुरवठा, ब्रह्मोस क्षेपणास्त्रांचे संभाव्य आधुनिकीकरण, पाचव्या पिढीच्या सुखोई-सत्तावन्न प्रगत लढाऊ विमानांचे प्रस्ताव आणि भारतातील नवीन नागरी अणुऊर्जा प्रकल्पांचा विस्तार यांसारख्या धोरणात्मक संरक्षण व ऊर्जा करारांना अंतिम स्वरूप मिळण्याची शक्यता आहे. त्याच वेळी इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेजेशकियन यांची उपस्थिती पश्चिम आशियातील संघर्ष शांत करण्यासाठी आणि जागतिक ऊर्जा पुरवठा साखळीतील अडथळे दूर करण्यासाठी भारताच्या मुत्सद्देगिरीला मोठे व्यासपीठ मिळवून देणारी आहे.

ब्रिक्स या समूहाचा प्रवास पाहिला तर तो विसाव्या शतकातील संस्थात्मक मक्तेदारीला दिलेले उत्तर म्हणून पुढे आला आहे. सुरुवातीला केवळ ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि नंतर दक्षिण आफ्रिका यांचा समावेश असलेल्या या गटाने आता भव्य रूप धारण केले आहे. इजिप्त, इथिओपिया, इंडोनेशिया, इराण, सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिराती यांसारख्या बलाढ्य व विकसनशील देशांच्या पूर्ण समावेशामुळे हा गट आज जगाच्या एकूण लोकसंख्येच्या तब्बल पन्नास टक्के भागाचे आणि जागतिक आर्थिक उत्पादनाच्या एका तृतीयांश भागाचे प्रतिनिधित्व करतो. पाश्चात्त्य विचारवंत आणि प्रसारमाध्यमांकडून अनेकदा ब्रिक्सकडे पाश्चात्यविरोधी आघाडी म्हणून संशयाने पाहिले जाते. मात्र, भारताने अत्यंत चातुर्याने आणि मुत्सद्देगिरीने या व्यासपीठाला 'पश्चिमविरोधी' बनू न देता 'पश्चिमेत्तर' आणि विकासाभिमुख ठेवण्यात यश मिळवले आहे. भारताची कूटनीतिक ताकद ही त्याच्या स्वतंत्र धोरणात्मक स्वायत्ततेमध्ये दडलेली आहे. एका बाजूला अमेरिका, युरोप आणि क्वाड समूहाशी घनिष्ठ संबंध ठेवून सागरी सुरक्षा व आधुनिक तंत्रज्ञानात सहकार्य करणे, तर दुसऱ्या बाजूला रशिया, चीन आणि आखाती देशांशी एकाच व्यासपीठावर समोरासमोर बसून आपले राष्ट्रीय हित साधणे—अशी दोन्ही ध्रुवांना जोडणारी कूटनीतिक कसरत आज जगातील केवळ भारतच यशस्वीपणे करू शकतो.

भारतासाठी ही परिषद केवळ एका मोठ्या राजनैतिक समारंभापुरती किंवा आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठेपुरती मर्यादित नाही, तर देशाच्या प्रत्यक्ष विकासाला चालना देणारे ठोस संस्थात्मक लाभ यातून भारताने मिळवले आहेत. सन २०१२ मध्ये नवी दिल्लीत मनमोहन सिंग यांच्या कार्यकाळात झालेल्या ब्रिक्स परिषदेदरम्यान पायाभूत सुविधांच्या विकासासाठी एका स्वतंत्र बहुपक्षीय बँकेची संकल्पना भारताने मांडली होती. या संकल्पनेतूनच 'नवीन विकास बँक' (न्यू डेव्हलपमेंट बँक) साकारली गेली. आज या बँकेने भारतातील सुमारे अठ्ठावीस मोठ्या विकास प्रकल्पांसाठी दहा अब्ज डॉलर्सहून अधिक कर्ज मंजूर केले आहे. मुंबई, चेन्नई आणि इंदूर येथील अत्याधुनिक मेट्रो प्रकल्प, दिल्ली-मेरठ प्रादेशिक जलद वाहतूक प्रणाली (आरआरटीएस), तसेच ग्रामीण व शहरी पायाभूत सुविधांच्या आधुनिकीकरणासाठी या निधीचा थेट उपयोग झाला आहे. यंदाच्या परिषदेत भारताने केवळ दोन दिवसांच्या शिखर बैठकीवर भर न देता, वर्षभर आरोग्य, शेती, शिक्षण, कामगार कल्याण, विज्ञान-तंत्रज्ञान आणि पर्यावरण अशा विविध क्षेत्रांत सातत्यपूर्ण बैठका घेऊन एक कृतिशील आराखडा तयार केला आहे.

विशेषतः जयपूर येथे झालेल्या व्यापारमंत्र्यांच्या बैठकीत सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांना जागतिक बाजारपेठेत प्रवेश मिळवून देणे, कृत्रिम बुद्धिमत्ता, उच्च कार्यक्षमता संगणन, जैवतंत्रज्ञान आणि हरित वित्तपुरवठा यांवर घेतलेले निर्णय भारताच्या आर्थिक प्रगतीला दीर्घकालीन बळ देणारे आहेत.

या संपूर्ण प्रक्रियेत भारताने उचललेली सर्वात क्रांतिकारक पावले म्हणजे 'ग्लोबल साउथ'चे म्हणजेच आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेतील विकसनशील व वंचित राष्ट्रांचे सातत्याने केलेले नेतृत्व. संयुक्त राष्ट्रे, सुरक्षा परिषद, जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांसारख्या विसाव्या शतकातील संस्थांवर आजही मोजक्याच पाश्चात्त्य देशांचे नियंत्रण आहे. ही एकाधिकारशाही मोडून काढून निर्णय प्रक्रियेत विकसनशील देशांना हक्काचे स्थान मिळावे, अशी भारताची भूमिका अत्यंत ठाम आहे. पाश्चात्त्य देशांच्या निर्बंधांमुळे जागतिक पुरवठा साखळी कोलमडते, तेव्हा त्याचा सर्वात मोठा फटका गरिबांना, अन्नसुरक्षेला आणि ऊर्जा पुरवठ्याला बसतो. अशा वेळी भारताने विकसित केलेल्या युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस (युपीआय) सारख्या डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा आणि स्थानिक चलनांमधील परस्पर व्यापाराची प्रणाली या देशांना आर्थिक स्वावलंबनाचा नवा मार्ग दाखवत आहे. डॉलरच्या वर्चस्वाला संपूर्णपणे नकार न देता, द्विपक्षीय व्यापारात स्थानिक चलनांचा सुरक्षित वापर वाढवण्याचा समतोल भारताने यशस्वीपणे साधला आहे.

या जागतिक महासंमेलनासाठी राष्ट्रीय राजधानी दिल्लीमध्ये अभूतपूर्व आणि चोख सुरक्षा व्यवस्था उभारण्यात आली आहे. दिल्ली पोलीस आणि केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या दोनशेहून अधिक कंपन्यांसह पंधरा हजारांपेक्षा जास्त सशस्त्र जवान अहोरात्र तैनात आहेत. महत्त्वाच्या परिसरांवर आधुनिक कॅमेरे, कमांड कंट्रोल यंत्रणा आणि ड्रोन उड्डाणांवर संपूर्ण बंदी घालण्यात आली असून, राजधानीला एका अभेद्य किल्ल्याचे रूप आले आहे. दिल्लीतील शाळा, महाविद्यालये आणि अनेक कार्यालयांना सुट्टी देऊन वाहतूक व्यवस्था पूर्णपणे सुरक्षित आणि सुरळीत ठेवण्यात आली आहे.

अठरावी ब्रिक्स शिखर परिषद ही निव्वळ एका आंतरराष्ट्रीय संघटनेची नियमित बैठक नसून, बहुध्रुवीय जगात भारताच्या वाढत्या वैभवाचा आणि स्वतंत्र विचारांचा गौरव आहे. कोणत्याही एका विचारसरणीच्या किंवा लष्करी आघाडीच्या बंधनात स्वतःला न अडकवता, स्वतःचे आर्थिक व सामरिक हित अग्रस्थानी ठेवून जगाला शांततेचा आणि संवादाचा मार्ग दाखवणारा देश म्हणून भारताने आपले स्थान पक्के केले आहे. संकटाच्या काळात पूर्व आणि पश्चिम यांच्यातील दरी सांधणारा एक निष्पक्ष, मुत्सद्दी आणि कणखर सेतू म्हणून भारताने घेतलेली ही झेप येणाऱ्या अनेक दशकांसाठी आंतरराष्ट्रीय राजकारणाचा नवा अध्याय लिहिणारी ठरणार आहे.

– ९५६१५९४३०६

# महिला आशिया चषक २०२६ : पाकिस्तानचे स्वप्न उधवस्त करत श्रीलंका फायनलमध्ये, भारताशी महामुकाबला

**डॉ.दत्ता विघावे**
**क्रिकेट समिक्षक**

पाकिस्तानची कर्णधार फातिमा सनाने श्रीलंकेविरुद्धच्या महिला आशिया कप २०२६ च्या उपांत्य फेरीच्या सामन्यात आपल्या संघाला विजय मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले, परंतु तिचे प्रयत्न अपुरे ठरले. श्रीलंकेने पाकिस्तानला चार गडी राखून पराभूत करून अंतिम फेरीत प्रवेश केला. सामना संपताच, फातिमा सनाला मैदानावर आपल्या भावनांवर नियंत्रण ठेवता आले नाही आणि ती ढसाढसा रडली.

फातिमाने या सामन्यात फलंदाजी आणि गोलंदाजी दोन्हीमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली. तिने प्रथम नाबाद ४७ धावा केल्या आणि नंतर गोलंदाजी करताना चार बळी घेतले. तिला सामनावीर म्हणूनही गौरविण्यात आले, परंतु तिच्या संघाच्या पराभवाच्या वेदनेने तिच्या कामगिरीवर सावट टाकले.

**सामनावीर, पण तरीही अश्रू ढाळले**

फातिमा सनाने ४७ धावांची नाबाद खेळी केली आणि चार बळी घेतले, ज्यामुळे तिला सामनावीर पुरस्कार मिळाला. मात्र, अंतिम फेरीत पोहोचण्यात संघाला आलेल्या अपयशाचे दुःख तिच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसत होते. सामन्यानंतर फातिमा भावुक झाली आणि तिच्या डोळ्यात अश्रू दाटून आले. तिचा हा फोटो सामन्यातील सर्वात भावनिक क्षणांपैकी एक ठरला.

**क्षेत्ररक्षणातील चुकांमुळे पराभव**

सामन्यानंतर, फातिमा सनाने कबूल केले की क्षेत्ररक्षणातील चुकांमुळे पाकिस्तानला पराभव पत्करावा लागला. ती म्हणाली की १३० धावांची धावसंख्या बचावण्यासारखी होती, पण संघाला आपल्या फलंदाजीतही सुधारणा करण्याची गरज आहे. महिला आशिया कपच्या उपांत्य फेरीत पाकिस्तानविरुद्ध श्रीलंकेचा हा सलग तिसरा विजय आहे. आता १३ सप्टेंबर रोजी अंतिम सामन्यात श्रीलंकेचा सामना भारताशी होईल.

**कठीण परिस्थितीत कर्णधाराने डाव सांभाळला**

नाणेफेक हरल्यानंतर प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्याने पाकिस्तानची सुरुवात खराब झाली. सतत विकेट पडत असल्याने संघ दबावाखाली आला. त्यावेळी फातिमा सनाने सूत्रे हाती घेतली. तिने ३६ चेंडूंमध्ये नाबाद ४७ धावा केल्या. उन्हामुळे फातिमाला पेटकेही आले, पण तिने मैदान सोडले नाही. टुबा हसनसोबत मिळून त्यांनी डावाच्या शेवटच्या चार षटकांत झटपट धावा केल्या आणि पाकिस्तानला १३०/६ पर्यंत पोहोचवले.

**पहिल्याच षटकात दोन मोठ्या विकेट्स**

१३० धावांचा बचाव करताना पाकिस्तानने गोलंदाजीत जोरदार सुरुवात केली. कर्णधार फातिमा सनाने तिच्या पहिल्याच षटकात श्रीलंकेची कर्णधार चमारी अटापट्टू आणि संजना कविंदी यांना सलग चेंडूंवर बाद केले. श्रीलंकेने अवघ्या ३३ धावांत चार विकेट्स गमावल्या होत्या. या टप्प्यावर पाकिस्तानची स्थिती मजबूत दिसत होती आणि सामना त्यांच्या बाजूने वळत असल्याचे वाटत होते.




**सनाचे अर्धशतक हुकले**

प्रथम फलंदाजी करताना पाकिस्तानची सुरुवात खराब झाली. दुसऱ्या षटकात मुनीबा अली (२) झेलबाद झाली. त्यानंतर शवाल झुल्फिकार आणि गुल फिरोझा यांनी डाव सावरला. त्यांनी दुसऱ्या विकेटसाठी २४ धावांची भागीदारी केली. पॉवरप्लेमध्ये झुल्फिकार (२४) बाद झाली. पॉवरप्लेनंतर, सातव्या षटकात आयेशा जफर (७) स्वस्तात बाद झाली. सदफ शमासने ८ धावा केल्या. त्यानंतर कर्णधार फातिमा सनाने गुल फिरोझासोबत भागीदारी केली. त्यांनी पाचव्या विकेटसाठी ४० धावा जोडल्या. १६व्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर चमारी अथापथ्थूने फिरोझाला (२१) झेलबाद करविले.

कर्णधार फातिमा सना ३६ चेंडूंमध्ये ४७ धावांवर नाबाद राहिली. तिच्या खेळीत तिने चार चौकार आणि दोन षटकार मारले. टुबा हसनने १२* धावांचे योगदान दिले. कर्णधार चमारी अथापथ्थू आणि चामुडी प्रबोध यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले.

**सनाने एकापाठोपाठ एक धक्के दिले**

१३१ धावांचा पाठलाग करताना, श्रीलंकेची सुरुवात खराब झाली आणि दुसऱ्याच षटकात त्यांना दोन धक्के बसले. कर्णधार फातिमा सनाने दुसऱ्या षटकाच्या दुसऱ्याच चेंडूवर चमारी अथापथ्थूला (५) सदाफ शमासकरवी झेलबाद केले. सनाने पुढच्याच चेंडूवर संजना कविंदीला बाद केले.

सुरुवातीला दोन गडी गमावल्यानंतर श्रीलंकेने भागीदारी केली. इमेशा दुलानी आणि हसिनी परेरा यांनी तिसऱ्या विकेटसाठी २५ चेंडूंमध्ये २६ धावा जोडल्या. त्यानंतर श्रीलंकेने दोन षटकांत दोन गडी गमावले. पॉवरप्लेच्या शेवटच्या षटकात परेरा (३) आयेशा जफरकरवी झेलबाद झाली. सातव्या षटकात इमेशा दुलानी (२२) बाद झाली.

**हर्षिता आणि कविशा यांनी साथ दिली**

श्रीलंकेने १० षटकांत ५३ धावांत ४ गडी गमावले होते. संघाला पुढील ६० चेंडूंमध्ये विजयासाठी ७८ धावांची गरज होती. सनाने १७ व्या षटकात पुन्हा एकदा यश मिळवले, पहिल्याच चेंडूवर हर्षिता समरविक्रमा (३६) आणि शेवटच्या चेंडूवर कविशा दिलहारी (३३) यांना बाद केले. त्यानंतर नीलाक्षिका सिल्वा (१८) आणि कौशानी नुत्यांगना (१०) यांनी श्रीलंकेचा विजय निश्चित केला. फातिमा सनाने ३.४ षटकांत ३८ धावा देऊन ४ बळी घेतले.

आता रविवारी या स्पर्धेचा शेवटचा म्हणजे अंतिम भारत व श्रीलंका यांच्या दरम्यान खेळला जाईल. भारताने या स्पर्धेत सरस कामगिरी केली असली तरी अंतिम सामन्याचा दबाव व रोमांच वेगळा असतो. भारतीय संघाला फलंदाजी व क्षेत्ररक्षणाकडे कटाक्षाने लक्ष लागेल. श्रीलंकेची फलंदाजी नवव्या क्रमांकापर्यंत भक्कम असल्याने भारतीय गोलंदाजांनाही सतर्क राहावे लागेल. पाकिस्तानच्या तुलनेत श्रीलंका संघ मजबूत असल्याने भारताचा निकराचे प्रयत्न करान लागतील तरच टिम इंडिया आपले आशिया चषक स्पर्धेचे विजेतपद आठव्यांदा खेचेल.

– ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# डी.जे. विरोधात आज शांती मार्च

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपुरात डी.जे. बंदी कायमस्वरूपी लागू करण्याच्या मागणीसाठी नागरिकांच्या सहभागाने रविवार, १३ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजता लक्ष्मीभुवन चौकातून ह्यशांती मार्च काढण्यात येणार आहे.

त्रिमूर्ती नगर रेसिडेंट्स ॲक्शन विंग फाउंडेशन (TRAW Foundation) आणि कॅग (CAG) च्या आवाहनानुसार हा मार्च आयोजित करण्यात आला असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. माजी आमदार तथा माजी महापौर संदीप जोशी यांच्या पुढाकारातून काही दिवसांपूर्वी

**लक्ष्मीभुवन चौकातून सकाळी ८ वाजता सुरुवात, नागरिकांना सहभागी होण्याचे आवाहन**

नागपुरात डी.जे. बंदीच्या मागणीसाठी जनचळवळ उभी राहिली होती. या चळवळीला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. वैद्यकीय क्षेत्रातील व्यक्तींसह विविध धर्मांचे प्रतिनिधी, सामाजिक संघटना आणि नागरिक या अभियानात सहभागी झाले होते. या संदर्भात मनपा आयुक्त आणि पोलिस आयुक्त यांनाही निवेदन देण्यात आले होते.

याच जनचळवळीला समर्थन देण्यासाठी 'TRAW' ने १३ सप्टेंबर रोजी शांती मार्चचे आयोजन केले आहे. सण आणि उत्सवांना विरोध नसून, कोणाचाही रोजगार हिरावून घेण्याचा उद्देश नाही. मात्र, डी.जे.च्या मोठ्या आवाजाचा त्रास सर्वसामान्य नागरिक, रुग्ण, दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांना होऊ नये, यासाठी कायमस्वरूपी डी.जे. बंदीला समर्थन देणे हा या मार्चमागील उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

दरम्यान, डी.जे. बंदीचा प्रश्न हा नागरिकांच्या आरोग्याशी आणि शांततेच्या अधिकाराशी संबंधित असल्याची भूमिका जनचळवळीत सहभागी नागरिकांनी मांडली आहे. परंपरा आणि उत्सवांचे समर्थन करताना आरोग्यासाठी हानिकारक ठरणाऱ्या ध्वनिप्रदूषणाला आळा घालण्याची गरज असल्याचेही आयोजकांनी स्पष्ट केले.




या शांती मार्चमध्ये माजी आमदार तथा माजी महापौर संदीप जोशी, आय.एम.ए. महाराष्ट्रच्या इलेक्टेड प्रेसिडेंट डॉ. मंजुषा गिरी, आय.एम.ए. अध्यक्ष डॉ. सचिन गाठे, कॅग (CAG) चे विवेक रानडे, इ.एन. टी. असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. अजय देशपांडे, डॉ. गोपाल अरोरा, क्रीडा प्रतिनिधी अशफाक शेख व इतर संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. यामध्ये शहरातील सर्व स्वयंसेवी संस्था आणि ज्यांना भविष्यात डी.जे.मुळे त्रास होणार आहे, अशा सर्वांनी रविवारच्या शांती मार्च मध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन त्रिमूर्ती नगर रेसिडेंट्स विंग फाउंडेशन व कॅगचे पदाधिकारी राजेश दाचेवार, तुषार कोठारी, प्रवीण मोहोड़, सचिन असवार, विवेक वैद्य, नितीश चौधरी आदींनी केले आहे.

## थोडक्यात

### सिर्सी येथे भव्य 'तान्हा पोळा उत्सव' व दहीहंडी स्पर्धा संपन्न, चोख पोलीस बंदोबस्त

**दै. सिंहवाणी वृत्त, सिर्सी**

स्व. संजयभाऊ डेकोटे यांच्या स्मृती प्रित्यर्थ तान्हा पोळा पंचकमेटी व समस्त गाववासी सिर्सी यांच्या सौजन्याने आणि स्व. भाऊसाहेब मुळक यांच्या स्मृती प्रित्यर्थ महाराष्ट्राचे माजी मंत्री सन्माननीय श्री. राजेंद्रबाबू मुळक यांच्यातर्फे सिर्सी येथे भव्य 'तान्हा पोळा उत्सव व पंचरंगी कार्यक्रम' मोठ्या उत्साहात पार पडला. या उत्सवाच्या निमित्ताने ५,००१ रुपये रोख पारितोषिकाची (देणगीदारः श्री. बबनगांव अभिमानजी दोडडे) थरारक दहीहंडी स्पर्धा रंगली, ज्यामध्ये प्रत्येक संघाला दोन संधी देण्यात आल्या; तसेच सायंकाळी 'नवरंग हंगामा ग्रुप' शोहित कुमार (नागपूर) व संगीत संचाचा डान्स आणि लावणीचा बहारदार कार्यक्रम पार पडला. 'चलो सिर्सी'च्या आवाहनाला प्रतिसाद देत नागरिकांनी या सोहळ्याला मोठी गर्दी केली होती, तर संपूर्ण कार्यक्रम शांततेत व सुरक्षित वातावरणात पार पाडण्यासाठी पोलीस स्टेशनचे ठाणेदार उमेश नासरे, अस्लम नवरागाबंदे आणि अमोल कोटेवार यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली गावात चोख पोलीस बंदोबस्त लावण्यात आला होता.

## दिघोरी येथे तान्हा पोळ्याचे भव्य आयोजन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर शहरातील सर्वात मोठ्या तान्हा पोळ्या पैकी एक असलेल्या दिघोरी येथील तान्हा पोळ्याचे आयोजन नगरसेवक व माजी स्थायी समिती अध्यक्ष पिंटू झलके यांच्यातर्फे दिघोरी चौक परिसर उमरेड रोड येथे करण्यात आलेले होते. यावेळी आमदार मोहन मते नागपूर महानगरपालिका आयुक्त विपिन इटनकर, जवळपास १० हजार लोकांची उपस्थिती दर्शनीय होती. यावेळी वेशभूषा व नंदी सजावट स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते. प्रथम विजेत्याला सोन्याची चैन, द्वितीय विजेत्याला दोन ग्राम सोन्याचा सिक्का, तृतीय विजेत्याला एक ग्राम सोन्याचा सिक्का तथा त्यानंतर क्रमांक पटकविणाऱ्या तीन विद्यार्थ्यांना चांदीची चैन बक्षीस म्हणून देण्यात आली व प्रोत्साहन बक्षीस म्हणून ३१ सायकलींचे सुद्धा वाटप करण्यात आले. त्याचबरोबर स्कूल बॅग व इत्यादी विविध वस्तूंचे सुद्धा वाटप करण्यात आले. पोळ्यांमध्ये समाविष्ट होणाऱ्या प्रत्येक मुला व मुलींना बक्षिसाचे वाटप करण्यात आले.

### तान्हा पोळ्यात चिमुकल्या 'फ्युचर डॉक्टर'चा स्तुत्य उपक्रम, 'गुड टच, बॅड टच'बाबत जनजागृती!

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

विदर्भातील प्रसिद्ध आणि लहान मुलांच्या आवडीचा सण असलेल्या 'तान्हा पोळा' साईबाबा नगर खरबी परिसर उत्सवामध्ये यंदा परंपरेसोबतच एका सामाजिक संदेशाची सुंदर सांगड पाहायला मिळाली. डॉक्टरच्या वेशभूषेत आलेल्या एका चिमुकलीने 'गुड टच आणि बॅड टच' (सुरक्षित आणि असुरक्षित स्पर्श) या अत्यंत संवेदनशील विषयावर जनजागृती करत उपस्थितांची मने जिंकली. तान्हा पोळ्यानिमित्त लहान मुले आपले लाकडी नंदीबैल सजवून उत्साहाने सहभागी होतात. या उत्सवात पांढरा कोट, गळ्यात स्टेथॉस्कोप घालून 'फ्युचर डॉक्टर' बनलेल्या या बालिकेने हातामध्ये जनजागृतीचे फलक (प्लेकार्ड्स) धरले होते. सणाच्या आनंदात केवळ खेळ- मज्जा न करता, बाल शोषणाविरोधात आणि स्वतःच्या सुरक्षितते विषयी लहान मुलांना सोप्या भाषेत मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न या चिमुकलीने केला.



# स्वर्गीय अनिलकुमार स्मृती पत्रकारिता पुरस्काराचे १३ सप्टेंबरला वितरण

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

विदर्भ गौरव प्रतिष्ठान व नागपूर श्रमिक पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ पत्रकार स्व. अनिलकुमार यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिला जाणारा 'स्वर्गीय अनिलकुमार पत्रकारिता पुरस्कार' यंदा रविवार, १३ सप्टेंबर रोजी प्रदान करण्यात येणार आहे. पत्रकार क्लब ऑफ नागपूर, सिव्हिल लाईन्स येथील सकाळी १० वाजता. हा पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला आहे. स्वर्गीय अनिलकुमार हे स्वातंत्र्योत्तर काळातील ज्येष्ठ कवी, विचारवंत व पत्रकार म्हणून परिचित होते.

पत्रकारिता क्षेत्रातील त्यांच्या योगदानाच्या स्मरणार्थ मागील चार दशकांपासून विदर्भातील पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पत्रकारांना या पुरस्काराने गौरविण्यात येते. पुरस्काराचे स्वरूप प्रत्येकी २१ हजार रुपये रोख, शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह असे आहे. २०२५ वर्षाच्या पुरस्कारासाठी 'कॅलिफोर्निया टाइम्स'चे मुख्य संपादक गिरीधर भीमरावजी देशमुख (वरूड, जि. अमरावती), पत्रकार व लोकमतचे उपमुख्य संपादक असलेले नरेश गणपतराव डोंगरे (नागपूर) तसेच दैनिक लोकसत्ताचे विदर्भ विभाग विशेष प्रतिनिधी मोहन मनोहर अटाळकर (अमरावती) यांची निवड करण्यात आली आहे.

हा पुरस्कार वितरण सोहळा खा. राजेंद्रजी जैन यांच्या शुभहस्ते व आ. अरुण लखानी यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. उपेंद्र कोठेकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. पत्रकार, साहित्यिक, सामाजिक कार्यकर्ते तसेच नागरिकांनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## महाकाली नगरात भव्य तान्हा पोळ्याचे आयोजन

**बालगोपालांच्या उत्साहाने परिसरात रंगले पारंपरिक वातावरण, विविध स्पर्धांमध्ये विजेत्यांना पारितोषिके**



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महाकाली नगर- १ येथे पारंपरिक तान्हा पोळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला परिसरातील बालगोपालांसह नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. लहान मुलांनी आकर्षक पद्धतीने सजवून आणलेल्या नंदीबैलांमुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. तान्हा पोळा हा विदर्भाच्या सांस्कृतिक परंपरेशी जोडलेला महत्त्वाचा सण असून, लहान मुलांमध्ये या परंपरेची जपणूक आणि संस्कार रुजावेत, या उद्देशाने महाकाली नगर-१ येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बालगोपालांनी उत्साहाने सहभाग घेत आपापले सजवलेले नंदीबैल आणले होते. विविध रंगांची सजावट, फुलांची आरास तसेच आकर्षक वेशभूषेमुळे कार्यक्रमाचे विशेष आकर्षण वाढले.

बालगोपालांचा उत्साह वाढविण्यासाठी पारितोषिकांचे आयोजन केले होते. यावेळी एकूण ८ पारितोषिके ठेवण्यात आली होती. यामध्ये उत्कृष्ट नंदीबैल सजावट, आकर्षक वेशभूषेसाठी समावेश होता. उत्कृष्ट सजावट आणि कल्पकतेने सहभागी झालेल्या बालगोपालांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमा दरम्यान पालक आणि नागरिकांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून बालगोपालांचा उत्साह वाढविला. पारंपरिक भारतीय संस्कृती आणि परंपरेची ओळख व्हावी, तसेच परिसरातील नागरिकांमध्ये सामाजिक व सांस्कृतिक एकोपा वाढावा आणि तान्हा पोळ्यामुळे परिसरातील बालगोपालांनी आनंद व्यक्त केला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नागरिकांनी आयोजकांचे कौतुक केले. अशी माहिती आशिष काळे यांनी दिली.

### सुधा कुपटकर यांचे निधन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



सुधा कुपटकर, रा. मनीष नगर यांचे आज सकाळी निधन झाले. त्या ९६ वर्षाच्या होत्या. त्यांचे मागे ५ मुली आणि १ मुलगा तसेच बराच मोठा आप्तपरिवार आहे. त्यांचे पार्थिवावर अंत्यसंस्कार आज मानेवाडा घाट येथे करण्यात आले.

## T M's Academy & Beauty Place तर्फे ग्रँड मेहंदी कॉम्पिटिशन सीझन-२ उत्साहात संपन्न

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

टी एम अकडमी अँन्ड ब्युटी प्लेस तर्फे आयोजित ग्रँड मेहंदी कॉम्पीटेशन सीजन -२ ही मेहंदी कलेला प्रोत्साहन देणारी स्पर्धा नुकतीच उत्साहपूर्ण आणि आनंददायी वातावरणात यशस्वीरीत्या संपन्न झाली. या स्पधेर्ला मेहंदी कलाकारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विविध प्रकारच्या आकर्षक, कलात्मक आणि नाविन्यपूर्ण मेहंदी डिझाइन्स साकारत सहभागी स्पर्धकांनी आपल्या कलागुणांचे उत्कृष्ट प्रदर्शन केले.

मेहंदी कलेमध्ये असलेली सर्जनशीलता, कल्पकता, बारकावे आणि कलात्मक दृष्टिकोन यांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धे दरम्यान सहभागी कलाकारांनी पारंपरिक तसेच आधुनिक शैलीतील विविध



मेहंदी डिझाइन्स साकारून उपस्थितांची मने जिंकली. प्रत्येक स्पर्धकाने आपल्या कल्पनाशक्तीचा प्रभावी वापर करत आकर्षक कलाकृती सादर केल्या.

या स्पर्धेचे आयोजन तेजश्री उपाध्याय यांनी केले. स्पधेर्चे परीक्षण मीनू गुप्ता यांनी केले. त्यांनी स्पर्धकांच्या कलाकृतींचे बारकाईने परीक्षण करून त्यातील रचना, सफाई, सर्जनशीलता, डिझाइनची वैशिष्ट्यपूर्ण मांडणी आणि कलात्मकता या विविध बाबींच्या आधारे विजेत्यांची निवड केली. याप्रसंगी कार्यक्रमाला मुख्य अतिथी आरती टेंभुर्णे यांची विशेष उपस्थिती लाभली. स्पधेर्तील उत्कृष्ट कलाकृती आणि प्रभावी सादरीकरणाच्या आधारे विजेत्यांची निवड करण्यात आली.

यामध्ये विजेती : खुशबू पठाण, प्रथम उपविजेती : अरहमा परवीन, द्वितीय उपविजेती : खुशाली यादव, विजेत्यांना त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल अभिनंदन करण्यात आले. तसेच स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व कलाकारांचेही त्यांच्या उत्स्फूर्त सहभागाबद्दल कौतुक करण्यात आले. स्पर्धेमुळे नवोदित तसेच अनुभवी मेहंदी कलाकारांना आपली कला आणि कौशल्य सादर करण्याची संधी मिळाली. या उपक्रमाच्या माध्यमातून मेहंदी कलेला व्यावसायिक आणि कलात्मक व्यासपीठ मिळावे, कलाकारांमध्ये सर्जनशीलतेला चालना मिळावी आणि त्यांच्या कौशल्याला योग्य प्रोत्साहन मिळावे, हा उद्देश साध्य झाल्याचे आयोजकांनी सांगितले.

यावेळी सहभागी कलाकारांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, भविष्यातही अशा प्रकारच्या विविध उपक्रमांचे आयोजन करण्याचा मानस टी एम अकॅडमी अँड ब्युटी प्लेस च्यावतीने सर्व सहभागी स्पर्धक, विजेते, परीक्षण मीनू गुप्ता, मुख्य अतिथी आरती टेभुर्णे तसेच कार्यक्रमाच्या आयोजनासाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार व्यक्त करण्यात आले.

### शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त राज्यस्तरीय लेख स्पर्धा

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**

महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय जीवनावर आपल्या विचारांचा ठसा उमटविणारे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे जन्मशताब्दी वर्ष सुरू आहे. या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने 'शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे : राजकीय नेते, कलावंत आणि माणूस' या विषयावर राज्यस्तरीय लेख स्पर्धेचे आयोजन केले आहे. बाळासाहेबांच्या विचारांचा, कार्याचा आणि महाराष्ट्राच्या आणि मराठी माणसांच्या अस्मितेसाठी त्यांनी दिलेल्या योगदानाचा वेध राजकीय अभ्यासक, सामाजिक विचारवंत, साहित्यिक, पत्रकार, वृत्तपत्र लेखक, विद्यार्थी, अभ्यासक, गृहिणी, आणि साहित्यप्रेमींनी आपल्या लेखणीतून घ्यावा असे आवाहन रवींद्र मालुसरे आणि विजय ना कदम यांनी केले आहे.




ही स्पर्धा राज्यस्तरीय असून, या स्पर्धेत दिनांक ५ ऑक्टोबर २०२६ पर्यंत सहभागी होऊ शकते. स्पर्धेसाठी आलेल्या लेखांना रोख पारितोषिक देण्यात येणार आहे तसेच याच नावाने लेखांचे पुस्तक दसऱ्याला प्रकाशित करण्यात येणार आहे. स्पर्धेविषयी अधिक सविस्तर माहितीसाठी ग्रंथ निर्मिती आणि स्पर्धा प्रमुख सुनील कुवरे ९१६७३६४८७०, दिगंबर चव्हाण ७७१५९२४५८८, रवींद्र मालुसरे ९३२३११७७०४ यांच्याशी संपर्क साधावा.

# गांधीनगरच्या तान्हा पोळ्यात अयोध्येचे प्रभू श्रीराम अवतरले

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

गांधीनगर येथील हनुमान मंदिराच्या पटांगणात पारंपरिक तान्हा पोळा उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. ११ सप्टेंबर रोजी आयोजित कार्यक्रमाला परिसरातील बालगोपालांसह नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. तान्ह्या पोळ्या निमित्त लहान मुलांनी आकर्षक सजविलेले नंदीबैल घेऊन सहभाग नोंदविला. विविध वेशभूषा आणि नंदीबैलांच्या आकर्षक सजावटीमुळे कार्यक्रमस्थळी उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

पश्चिम नागपूर- धरमपेठ मंडळ भाजपाचे कोषाध्यक्ष बिपिन गिरडे यांच्या नेतृत्वाखाली तान्ह्या पोळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी परिसरातील बालगोपालांनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून तसेच नंदीबैलांना आकर्षक सजावट करून कार्यक्रमात सहभाग घेतला. बालगोपालांच्या उत्साहाला प्रोत्साहन देण्यासाठी विविध प्रकारची पारितोषिके व बक्षिसे ठेवण्यात आली होती. या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरला तो बी.आर.मुंडले हायस्कूलमध्ये शिकणारा ७ वर्षीय विद्यार्थी, अक्षत स्मित टिचकुले.

अक्षतने वेशभूषा तसेच नंदीबैल सजावट या दोन्ही प्रकारांत उत्कृष्ट सादरीकरण करत प्रथम क्रमांक पटकाविला. त्याने साकारलेल्या वेशभूषेत अयोध्येचे प्रभू श्रीराम यांची भूमिका सादर केली होती. श्रीरामाच्या वेशभूषेत सजलेल्या अक्षतने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. अक्षतच्या या कलात्मक सादरीकरणाचे उपस्थित मान्यवर व नागरिकांनी कौतुक करून अभिनंदन केले. लहान वयात धार्मिक आणि पारंपरिक संस्कृतीशी जोडलेले सादरीकरण केल्याबद्दल त्याचे विशेष कौतुक करण्यात आले.

तान्हा पोळा हा लहान मुलांमध्ये भारतीय संस्कृती, परंपरा आणि शेतीशी संबंधित बैलांविषयीची कृतज्ञता जपण्याचा विदर्भातील महत्त्वाचा उत्सव मानला जातो. या निमित्ताने बालगोपालांना पारंपरिक सणांचे महत्त्व समजावे आणि त्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने विविध उपक्रमांचे आयोजन केले होते.

गांधीनगरात तान्हा पोळ्यात बालगोपालांनी उत्स्फूर्त सहभाग घेतल्याने संपूर्ण परिसरात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. विशेषतः प्रभू श्रीरामाची वेशभूषा साकारत प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या



अक्षत स्मित टिचकुलेच्या पोळ्याची विशेष आठवण सादरीकरणाने यंदाच्या तान्हा नागरिकांच्या मनात राहिली.

थोडक्यात

## मोहागांव सावंगी येथे उत्साहात पोळा साजरा

दै. सिंहवाणी वृत्त, कळमेश्वर

कळमेश्वर तालुक्यातील मोहागाव सावंगी येथे पारंपरिक पोळा सण मोठ्या उत्साहात व जल्लोषात साजरा करण्यात आला.



पोळ्यानिमित्त संपूर्ण गावात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. शेतकऱ्यांनी आपल्या बैलांना आकर्षक पद्धतीने सजवून पारंपरिक रीतीरिवाजानुसार पोळा उत्सवात सहभाग घेतला. यावेळी गावातून बाजे-गाजे व ढोल- ताशांच्या गजरात १७ बैलजोड्या सजवून कार्यक्रमस्थळी आणण्यात आल्या. रंगीबेरंगी सजावटीने नटलेल्या बैलजोड्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. शेतकऱ्यांनी बैलांची पूजा-अर्चा करून शेतीच्या कामात मोलाचे योगदान देणाऱ्या पशुधनाप्रती कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी सरपंच आशुतोष ताभने यांच्या हस्ते गावातील सर्व शेतकऱ्यांचा सत्कार करण्यात आला. शेतकऱ्यांना टोपी व दुपट्टा देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. या सत्कारामुळे कार्यक्रमातील उत्साह अधिक वाढला. ग्रामस्थांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून पारंपरिक पोळा उत्सवात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

पोळा सणाच्या आयोजनाला यशस्वी करण्यासाठी आशुतोष ताभने, विजय ठाकरे, चक्रधर भोयर, लेखिनराव भोयर, उमराव नाखले यांच्यासह गावातील अनेक नागरिकांनी परिश्रम घेतले. विशेषतः गावातील लहान मुलांमध्ये पोळा सणाबद्दल मोठा उत्साह पाहायला मिळाला. मुलांनीही सजवलेल्या बैलांसोबत कार्यक्रमात सहभाग घेत उत्सवाचा आनंद लुटला. पोळा हा केवळ धार्मिक व पारंपरिक सण नसून शेतकरी आणि त्यांचे पशुधन यांच्यातील जिव्हाळ्याचे नाते अधोरेखित करणारा महत्त्वपूर्ण सण आहे. शेतीच्या कामात बैलांचे असलेले योगदान लक्षात घेऊन त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची ही परंपरा आजही ग्रामीण भागात जपली जात आहे.

## निमखेडा हिंगणा टोली येथे तान्हा पोळ्यानिमित्त मुलांना शैक्षणिक साहित्याचे वाटप



दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी

चाचेर - निमखेडा जिल्हा परिषद सर्कल अंतर्गत येणाऱ्या शेतकरी व मजूरवर्गांचे वास्तव्य असलेल्या निमखेडा हिंगणा टोली तान्हा पोळा सणाचा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी मुलांना शालेय साहित्य वही, पुस्तक, पेन, पेन्सिल वाटप करण्यात आले. या कार्यक्रमला संकेत झाडे सरपंच खंडाळा(गांगनेर), भाजपा किसान आघाडी जिल्हा महामंत्री, मनोज झाडे उपसरपंच निमखेडा,विनोद बिसेन तंटामुक्ती अध्यक्ष, उमेश शेंडे,प्रशांत ढोमणे, पंकज अमृते, विजय जांभुळे, लखन वाघमारे, बंडू जांभूळे, महेंद्र मरसकोल्हे, रज्जु कुर्रे, मनराज पंधरे, कैलास कालसर्पे, बिहारी वाघ,अंकुश लिंगे, छोटीबाई बिसेन, रंजूबाई मुरखे, कांता मरस्कोल्हे, सुलोचना राऊत सह मोठया प्रमाणात हिंगणा टोलीतील गावकरी उपस्थित होते.

## आज मौदा येथे दहीहंडीचे आयोजन

### मुख्य आकर्षक 'सैराट' ची आर्ची- रिंकू राजगुरू, महसूल मंत्री तथा पालकमंत्री व राज्यमंत्री राहणार उपस्थित

दै. सिंहवाणी वृत्त, मौदा

येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज चौक,भारतीय जनता पार्टी कार्यालय समोर आज रविवार (ता.१३)दुपारी ४.०० वाजता



उदघाटक चंद्रशेखर बावनकुळे महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री नागपूर जिल्हा व आशिष जयस्वाल राज्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या मुख्य उपस्थितीत मौदा दहीहंडी महोत्सव पार पडणार आहे. मौदा दहीहंडी महोत्सव मध्ये मुख्य आकर्षक रिंकू राजगुरू सैराट फेम आर्ची उपस्थित राहणार आहेत.

मौदा दहीहंडी फोडून जिंकणाऱ्या टीमला १, ११, १११ रुपये (एक लाख अकरा हजार एकसे एक रुपये बक्षीस ठेवण्यात आले आहे. मौदा भव्य दहीहंडी महोत्सव मध्ये जास्तीत जास्त टीम ने आणि जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन मौदा नगरपंचायत चे नगराध्यक्ष प्रसन्ना बाबुराव तिडके, भाजपा मौदा शहर अध्यक्ष रमेश कुंभलकर, भाजपा युवा मोर्चा मौदा अध्यक्ष प्रकाश (बंटी) हटवार, भाजपा महिला आघाडी अध्यक्ष कल्पनाताई मानकर यांनी केले आहे.

मौदा दहीहंडी महोत्सव २०२६ ला प्रमुख पाहुणे म्हणून आशिष देशमुख आमदार सावनेर, प्रवीण दटके आमदार मध्य नागपूर, परिणय फुके आमदार विधान परिषद, डॉ.राजीव पोद्दार आमदार विधान परिषद, कृपाल तुमाने आमदार विधान परिषद, टेकचंद सावरकर माजी आमदार, सुधाकर कोहळे माजी आमदार, आनंदराव राऊत जिल्हाध्यक्ष भाजपा नागपूर, संकेतदादा बावनकुळे अध्यक्ष श्री श्री फाउंडेशन, चेतन खडसे जिल्हाध्यक्ष भाजपा युवा मोर्चा, प्रीतीताई मानमोडे अध्यक्ष महिला आघाडी नागपूर जिल्हा, भगवान बावनकुळे अध्यक्ष भाजपा मौदा तालुका हे उपस्थित राहणार आहेत.

# प्रा. अनिल सोले यांचा वाढदिवसानिमित्त २० सप्टेंबर रोजी भव्य नागरी सत्कार

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची प्रमुख उपस्थिती

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर




प्रदीर्घ सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, पर्यावरणीय आणि सांस्कृतिक कायार्तून समाजजीवनात आपला ठसा उमटविणारे प्रा. अनिल सोले यांच्या ६७ व्या वाढदिवसानिमित्त भव्य नागरी सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. प्रा. अनिलजी सोले मित्र परिवाराच्या वतीने रविवार, २० सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता ग्रँड बँक्वेट हॉल, दक्षिण एअरपोर्ट मेट्रो स्टेशनजवळ, वर्धा रोड, नागपूर येथे हा सोहळा होणार आहे.

या कार्यक्रमाला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि महाराष्ट्राचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. यावेळी प्रा. अनिल सोले यांच्या बहुआयामी कार्यावर आधारित 'अविरत कार्यरत : प्रा. अनिल सोले' या गौरवग्रंथाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास सर्व आमदार, भाजपाचे पदाधिकारी, विविध क्षेत्रांतील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, शैक्षणिक क्षेत्रातील व्यक्ती, साहित्यिक, कलाकार, युवक तसेच प्रा. सोले यांचे सहकारी व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

प्रा. अनिल सोले यांनी विद्यार्थी चळवळीपासून आपल्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात करत विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान दिले आहे. शिक्षक, लोकप्रतिनिधी, महापौर, सामाजिक कार्यकर्ते आणि पर्यावरणप्रेमी म्हणून त्यांनी आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली. नागपूरच्या विकासासोबतच पर्यावरण संवर्धन, जलसंधारण, वृक्षारोपण, शिक्षण, युवक सक्षमीकरण आणि सांस्कृतिक क्षेत्रात त्यांनी विविध उपक्रम राबविले.

नागपूरचे महापौर म्हणून त्यांच्या कार्यकाळात लोकसहभागातून विकासाला चालना देण्यासोबतच 'हरित नागपूर', स्वच्छता, आरोग्य आणि नाग नदीच्या पुनरुज्जीवनासारख्या विषयांना त्यांनी प्राधान्य दिले. ग्रामीण भागात जलसंवर्धन व जलसंधारणाच्या माध्यमातून पाण्याच्या प्रश्नावर काम करण्यासोबतच वृक्षारोपण आणि पर्यावरण संवर्धनाच्या उपक्रमांनाही त्यांनी चालना दिली.

युवकांना सक्षम करण्याच्या उद्देशाने 'यूथ एम्पॉवरमेंट समिट'सारख्या उपक्रमांच्या माध्यमातून युवकांना विचार, कौशल्य आणि नेतृत्वासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे कामही त्यांनी केले. राजकारणात सक्रिय असतानाही साहित्य आणि कवितेशी असलेले नाते जपत त्यांनी आपले कवीमन आणि सांस्कृतिक संवेदनशीलता कायम ठेवली आहे.

प्रा. सोले यांच्या या बहुआयामी कार्याचा गौरव करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या नागरी सत्कार सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन प्रा. अनिलजी सोले मित्र परिवाराचे संयोजक गिरीश व्यास यांनी केले आहे.

पत्रकार परिषदेला आमदार संजय भेंडे, संयोजक ज्येष्ठ नेते गिरीश व्यास, जयप्रकाश गुप्ता आणि डॉ. गौरीशंकर पाराशर यांची उपस्थिती होती.यांची उपस्थिती होती आमदार प्रविण दटके, अशोक मानकर, डॉ. मिलिंद माने, विकास कुंभारे, संजय दुधे, संदीप जाधव, विलास त्रिवेदी, चेतन कायरकर, आशिष वांदिले, प्रमोद पेंडके, भोलानाथ सहारे, सुनील पाटील, राजू कनाठे, प्रतीक घोडे, शैलेश ढोबळे, हरीश केवटे, आशिष पाठक, भुषण केसकर, महेंद्र राऊत, सुनील अग्रवाल, सुधीर पारवे, बाळासाहेब कुलकर्णी, पवन तिवारी, रविंद्र येणूरकर, प्रतिक घोडे, आशिष मेरखेडे यांची. उपस्थिती होती.

## ढोल-ताशा महावादन विश्वविक्रमाबद्दल चंद्रकांतदादा पाटील यांनी केले अभिनंदन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर




महाराष्ट्राच्या प्राचीन आणि समृद्ध परंपरेचे प्रतीक असलेल्या ढोल-ताशा वादनातून नागपूरच्या युवा शक्तीने विश्वविक्रमाची नोंद केल्याबद्दल उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी 'मंथन4युवा नागपूर २०२६'च्या आयोजकांचे आणि सहभागी ढोल ताशा पथकांचे अभिनंदन केले. या ऐतिहासिक कामगिरीबद्दल अभिनंदनाचा कार्यक्रम रवी भवन येथे आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाला ४० ढोलताशा पथकातील ४०३५ वादक उपस्थित होते.

रेशीमबाग मैदानावर 'जनमंथन'च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'मंथन4युवा नागपूर २०२६' या युवा महोत्सवाच्या भव्य समारोप सोहळ्यात ४० ढोल-ताशा पथकातील वादकांनी एकाच वेळी, एकाच लयीत केलेले महावादन विशेष आकर्षण ठरले होते. या उपक्रमातून इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स, आशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स आणि वर्ल्ड रेकॉर्ड्स बुक ऑफ इंडिया अशा तीन विक्रमांची नोंद झाली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत या विश्वविक्रमाची घोषणा करण्यात आली होती.

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेला युवा शक्तीने दिलेली ही नवी ऊर्जा कौतुकास्पद असून, ढोल-ताशांच्या माध्यमातून महाराष्ट्राची संस्कृती आणि युवा सामर्थ्य देश-विदेशात पोहोचविणाऱ्या या उपक्रमाचे चंद्रकांतदादा पाटील यांनी अभिनंदन केले.

हा संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संयोजक विष्णू चांगदे व रितेश गावंडे यांच्यासह संचालन समितीचे डॉ. राजेश गादेवार, डॉ. देवेंद्र भोंगाडे, डॉ. अभय मुद्गल, केतन मोहितकर, डॉ. संजय ढोबळे, डॉ. सोमदत्त करंजीकर, विनय चावला, प्रकाश शुक्ला, निधी बावशे, डॉ. सचिन हजारे, डॉ. प्रदीप बिबटे, विनोद कडू, डॉ. राजेश ढोबळे, डॉ. विजय दातारकर, वैभव बावनकर, डॉ. सुमित सिंह, डॉ. राजेश देवकाते आणि डॉ. गजानन पोलनवार यांनी परिश्रम घेतले.

## बायपास चौकात बालगोपालांचा तान्हा पोळा उत्साहात

### ७०० हून अधिक बालगोपालांचा सहभाग, १५० पेक्षा जास्त बक्षिसांची लकी ड्रॉद्वारे उधळण



दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड

बायपास चौक, उमरेड येथे बालगोपालांचा तान्हा पोळा मोठ्या उत्साहात आणि आनंदमय वातावरणात साजरा करण्यात आला. मागील ३६ वर्षांपासून या तान्हा पोळ्याचे आयोजन करण्यात येत आहे. या तान्हा पोळ्यात जवळपास ७०० हून अधिक बालगोपालांनी विविध वेशभूषा परिधान करून सजविलेले नंदी घेऊन सहभाग नोंदविला. कार्यक्रमाला उमरेड विधानसभा क्षेत्राचे आमदार संजयजी मेश्राम, माजी नगराध्यक्ष गंगाधरराव रेवतकर, प्रतिष्ठित व्यक्तिमत्त्व पंजाबराव अंभोरे,राजेश मेश्राम, सुरेशजी झूरमुरे, जगदीशजी वैद्य, यशवंतराव वंजारी, हरिश्चंद्र दहाघाणे, शशिकांत पवार, सुरेखाताई रेवतकर, सतीश कामडी यांच्यासह अनेक मान्यवरांची मंचावर उपस्थिती होती.

यावेळी उत्कृष्ट वेशभूषा, आकर्षक नंदी सजावट तसेच सामाजिक संदेश देणाऱ्या बालगोपालांना पारितोषिके देण्यात आली. विशेष म्हणजे लकी ड्रॉ पद्धतीने १५० हून अधिक बालगोपालांना विविध बक्षिसे देण्यात आली. त्यामुळे बालगोपालांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला आणि कार्यक्रमस्थळी उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाचे संचालन केतन रेवतकर व हरिश्चंद्र दहाघाणे यांनी केले, तर आभार प्रदर्शन शशिकांत पवार यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी उमेशजी भोंदले, राजेश भांडे, अजय रहाटे, मयूर रेवतकर, आभास भोंदले, चेतन गिरडकर, सूरज चरडे यांच्यासह संपूर्ण टीमने पुढाकार घेतला. परिसरातील नागरिक व बांधवांनी सहकार्य केले.

## जि. प. उच्च प्राथमिक शाळा पंचाळा बु. येथे तान्हापोळा उत्साहात साजरा

दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक :- पंचाळा बु. : जि. प. उच्च प्राथमिक शाळा पंचाळा बु. येथे पारंपरिक तान्हापोळा उत्सव मोठ्या उत्साहात व आनंदाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृती, परंपरा आणि शेतीशी निगडित सणांविषयी जिव्हाळा



निर्माण व्हावा, या उद्देशाने शाळेत तान्हापोळ्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी आकर्षक पद्धतीने सजविलेले लाकडी बैल आणून त्यांची मिरवणूक काढली. विद्यार्थ्यांनी पारंपरिक पोशाखात सहभागी होत उत्सवाचा आनंद घेतला. तान्हापोळ्याच्या माध्यमातून बैलांचे शेतीतील महत्त्व तसेच शेतकरी आणि कृषी संस्कृतीशी असलेले नाते विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले. कार्यक्रमास मुख्याध्यापक अजय चव्हाण, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रवीण मोहनकर, शिक्षक विष्णू सूर्यवंशी, सुनील काळे, प्रियंका हिप्परकार, मनीषा भोडे, ढोके सर,श्रद्धा जामगाडे, ऐश्वर्या मात्रे तसेच शाळेतील विद्यार्थी उपस्थित होते.

## नरखेडमध्ये संत्रा-मोसंबी फळबाग व्यवस्थापनाचा तज्ज्ञांकडून मंत्र

### कीड-रोग नियंत्रण, फळगळ, माती, जल व खत व्यवस्थापनाबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन

दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड




संत्रा व मोसंबी फळबागांमध्ये वाढता कीड-रोगांचा प्रादुर्भाव, फळगळ, बदलते हवामान आणि वाढता उत्पादन खर्च या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना शास्त्रोक्त फळबाग व्यवस्थापनाची माहिती मिळावी, यासाठी तालुका कृषी अधिकारी कार्यालय, नरखेड यांच्या वतीने संत्रा व मोसंबी फळबाग व्यवस्थापन विषयक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. ९ सप्टेंबर रोजी प्रशासकीय इमारत, नरखेड येथे झालेल्या या कार्यशाळेला संत्रा व मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

नरखेड तालुक्यात संत्रा व मोसंबी ही प्रमुख फळपिके असून अनेक शेतकऱ्यांचे आर्थिक गणित या पिकांवर अवलंबून आहे. अनियमित पाऊस, तापमानातील बदल, कीड-रोगांचा प्रादुर्भाव, फळगळ तसेच पाणी व खतांचे अयोग्य व्यवस्थापन यामुळे उत्पादन आणि फळांच्या गुणवत्तेवर परिणाम होत आहे. या समस्या लक्षात घेऊन कार्यशाळेत शेतकऱ्यांना आधुनिक आणि कमी खर्चातील व्यवस्थापन पद्धतींची माहिती देण्यात आली.

प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वंडली फार्म येथील कीटकशास्त्रज्ञ डॉ. पंचभाई यांनी संत्रा व मोसंबी बागांतील विविध किडी व रोगांची ओळख, त्यांची लक्षणे, प्रादुर्भावाची कारणे आणि नियंत्रणाच्या उपाययोजनांबाबत मार्गदर्शन केले. बागेची नियमित पाहणी करून कीड व रोगांचा प्रादुर्भाव सुरुवातीच्या अवस्थेतच ओळखल्यास नियंत्रण अधिक प्रभावी ठरते, असे त्यांनी सांगितले. एकात्मिक कीड व्यवस्थापनाचा अवलंब करण्यासोबतच अनधिकृत ठिकाणांहून रोपे न घेता अधिकृत व परवानाधारक नर्सरीमधूनच निरोगी व प्रमाणित कलमे-रोपे खरेदी करण्याचा सल्लाही त्यांनी दिला.

प्रगतिशील शेतकरी व सर्टिफाइड ट्रेनर गोपाल भक्ते यांनी माती परीक्षण, नैसर्गिक पद्धतीने उत्पादन, जल व्यवस्थापन आणि खत व्यवस्थापन याबाबत अनुभवाधारित मार्गदर्शन केले. माती परीक्षणाच्या आधारे खतांचा वापर केल्यास अनावश्यक खर्च टाळता येतो. तसेच पिकाच्या गरजेनुसार सिंचनाचे नियोजन, पाण्याचा काटकसरीने वापर आणि खतांची योग्य मात्रा व योग्य वेळ यामुळे उत्पादन खर्च कमी करून उत्पादनाची गुणवत्ता वाढविता येते, असे त्यांनी स्पष्ट केले.

संत्रा-मोसंबी बागांमधील फळगळ ही शेतकऱ्यांसमोरील महत्त्वाची समस्या असल्याने त्यामागील कारणे शोधून उपाययोजना करण्याची गरज असल्याचेही कार्यशाळेत स्पष्ट करण्यात आले. पाण्याचा ताण, अतिरिक्त पाणी, अन्नद्रव्यांची कमतरता, कीड-रोग आणि हवामानातील बदल यांचा फळगळीसाठी परिणाम होऊ शकतो. त्यामुळे केवळ औषध फवारणीवर अवलंबून न राहता बागेचे सर्वांगीण व्यवस्थापन करण्याचा सल्ला देण्यात आला.

कार्यशाळेदरम्यान शेतकऱ्यांनी फळगळ, कीड-रोग, खतांचा वापर, पाणी व्यवस्थापन, रोपांची निवड आणि उत्पादनवाढीबाबत विविध प्रश्न उपस्थित केले. तज्ज्ञांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांना उत्तरे देत शास्त्रोक्त उपाययोजनांची माहिती दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पंकज कोकाटे यांनी केले. यावेळी तालुका कृषी अधिकारी कार्तिक कोळी, मंडळ कृषी अधिकारी गजानन ढवळे, मंडळ कृषी अधिकारी रोशन चंडी मेश्राम यांच्यासह कृषी विभागातील अधिकारी, कर्मचारी आणि मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. कार्यशाळेमुळे संत्रा व मोसंबी बागांचे उत्पादन, गुणवत्ता आणि शाश्वत व्यवस्थापनासाठी शेतकऱ्यांना उपयुक्त दिशा मिळाली.

थोडक्यात

## पोरवाल कॉलेजच्या मुलांची कबड्डी टीम जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्र



**दै. सिंहवाणी वृत्त, कामठी**

येथील स्थानिक एस के पोरवाल कनिष्ठ महाविद्यालयच्या विद्यार्थ्यांची कबड्डी टीम तालुकास्तरावर चमकली. क्रीडा व युवक संचनालय पुणे, अंतर्गत आयोजित तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धा वयोगट १९ तसेच वयोगट १७ मुले यांची तालुकास्तरीय स्पर्धा एस के पोरवाल कॉलेजच्या मैदानावर संपन्न झाल्या. या स्पर्धेमध्ये विविध शाळेतील मुलांनी भाग घेतला होता. यामध्ये वयोगट १९ विरुद्ध विद्यामंदिर हायस्कूल कोराडी यामध्ये लढत झाली. यामध्ये एस के पोरवाल कॉलेजने १९ गुणांनी विजय मिळवित जिल्हास्तरावर आपले स्थान पक्के केले. विद्यार्थ्यांना डॉक्टर मल्लिका नागपुरे यांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले तसेच कॉलेजचे प्राचार्य डॉ. स्वप्नील दहात व कॉलेजचे उपप्राचार्य वंजारी सर व पर्यवेक्षक मेंढे सर व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्या कर्मचारी यांनी विजयी मुलांच्या संघाला पुढील जिल्हास्तरीय स्पर्धांकरिता शुभेच्छा दिल्या.

## श्रीकृष्ण मंदिरात 'तान्हा पोळा' मोठ्या संपन्न



**दै. सिंहवाणी वृत्त, भंडारा**

स्थानिक श्रीकृष्ण मंदिर, भंडारा येथे लहान मुलांचा लाडका सण 'तान्हा पोळा' अत्यंत थाटामाटात आणि पारंपारिक उत्साहात साजरा करण्यात आला. विदर्भाच्या सांस्कृतिक परंपरेचे प्रतीक असलेल्या या महोत्सवात परिसरातील शेकडो बालचमूंनी आपल्या लाकडी नंदीबैलांसह (तान्हा पोळा) उत्साहाने सहभाग घेतला होता.दरवर्षीप्रमाणे यंदाही श्रीकृष्ण मंदिर देवस्थान समितीच्या वतीने या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला भगवान श्रीकृष्ण आणि राधा राणीच्या मूर्तीची विशेष पूजा-अर्चा व आरती करण्यात आली. या सोहळ्याचे शानदार उद्घाटन प्रभागाचे लोकप्रिय नगरसेवक हरिश्चंद्र मडावी यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी आंब्याच्या पानांचे पारंपरिक तोरण आणि रंगीबेरंगी फुग्यांचे तोरण तोडून कार्यक्रमाची रितसर सुरुवात केली.

यावेळी त्यांनी उपस्थित बाल गोपाळांना तान्हा पोळ्याच्या शुभेच्छा दिल्या. हिवांश आपल्या चिमुकल्या लाकडी नंदीबैलासह आयुष्यात पहिल्यांदाच या पोळा महोत्सवात सहभागी झाला होता. त्याचे हे कौतुक पाहून देवस्थान पंचकमिटीच्यावतीने त्याचे विशेष आणि उत्साही स्वागत करण्यात आले, जे उपस्थितांच्या आकर्षणाचे केंद्र ठरले.मान्यवरांच्या हस्ते भेटवस्तू व 'बोजारा' वाटपया कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून डॉ. योगेश जीभकाटे, संजय लिमजे, अमोल (छोटू) मानापुरे, आशिष महाकाळकर, मुन्ना गुप्ता आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते. या सर्व मान्यवरांच्या हस्ते उपस्थित लहान मुलांना आकर्षक भेटवस्तू देऊन त्यांचा उत्साह वाढविण्यात आला. तसेच, श्रीकृष्ण मंदिर देवस्थान पंच कमिटीच्या वतीने परंपरेनुसार प्रत्येक लहान मुलाला ११ रुपये 'बोजारा' (रोख रक्कम) देण्यात आला, ज्यामुळे बालचमूंचे चेहरे आनंदाने खुलले होते.

यावेळी लहान मुलांनी आपापल्या लाकडी बैलांना (नंदीबैल) विविध रंगीबेरंगी रंग, फुगे, चमकी, घुंगरू आणि आकर्षक बाशिंग लावून नयनरम्य पद्धतीने सजवले होते. अनेक बालकांनी पारंपारिक पोषाख व फेटे परिधान केले होते, ज्यामुळे संपूर्ण मंदिर परिसर बाल गोपाळांच्या आनंदाने आणि किलबिलाटाने ओसंडून वाहत होता. मुलांनी आपल्या लाडक्या 'राजा-सर्जा'ला घेऊन मंदिराच्या परिसरात फेऱ्या मारल्या. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी श्रीकृष्ण मंदिर समितीचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच परिसरातील नागरिक आणि महिला मंडळाने मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमाला बालक, पालकांची आणि प्रभागातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## गोंडबोरी येथे तान्हा पोळा उत्साहात



**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

गोंडबोरी येथे नंदी पोळा उत्सव मंडळाच्या वतीने तान्हा पोळा उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी सुमारे ६० बालकांनी नंदीबैलांसह सहभाग नोंदविला. बालगोपालांचा उत्साह वाढविण्यासाठी दरवर्षी मंडळाच्या वतीने तान्हा पोळ्याचे आयोजन केले जाते. यंदा सहभागी बालकांना शालेय भेटवस्तू म्हणून टिफिन बॉक्स, पाण्याची बाटली आणि बास्केट बॅग देण्यात आली. कार्यक्रमाला सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, पोलिस पाटील यांच्यासह आयोजक शैलेश माळवे, अजय वारकर, अँड. राहुल टाले, अनिकेत काकडे, किशोर वाकडे, शरद माळवे, दिवाकर माळवे, बजरंग दल कार्यकारी समितीचे पदाधिकारी तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

# आदासा गणेश मंदिराला 'ब' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा



### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजनेअंतर्गत राज्य शासनाचा निर्णय, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा पुढाकार

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

कळमेश्वर तालुक्यातील प्रसिद्ध आणि ऐतिहासिक आदासा गणेश मंदिराला 'ब' वर्ग ग्रामीण तीर्थक्षेत्राचा दर्जा देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाने घेतला आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजना (ब वर्ग) अंतर्गत हा दर्जा देण्यात आला आहे.

या निर्णयामुळे आदासा येथील धार्मिक पर्यटनाला चालना मिळण्यासोबतच भाविकांसाठी विविध पायाभूत सुविधा विकसित होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

यासंदर्भातील शासन निर्णय ८ सप्टेंबर २०२६ रोजी ग्रामविकास विभागामार्फत जारी करण्यात आला. आदासा गणेश मंदिराला 'ब' वर्गाचा दर्जा देण्याचा प्रस्ताव जिल्हा परिषद, नागपूरच्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून शासनाकडे सादर करण्यात आला होता. राज्य निकष समितीच्या १९ ऑगस्ट २०२६ रोजी झालेल्या बैठकीत या प्रस्तावाची छाननी करण्यात आली. शासन निर्णयातील निकषांनुसार प्रस्ताव परिपूर्ण असल्याचे आढळून आल्यानंतर आदासा येथील गणेश मंदिरास 'ब' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा देण्यास मान्यता देण्यात आली. आदासा गणेश मंदिर हे नागपूर जिल्ह्याच्या धार्मिक आणि सांस्कृतिक वैभवाचे महत्त्वाचे केंद्र असून, 'ब' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळाल्यामुळे या परिसराच्या सर्वांगीण विकासाला निश्चितच गती मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

आदासा गणेश मंदिराला 'ब' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळणे ही नागपूर जिल्ह्यासाठी आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे. आदासा हे विदर्भातील श्रद्धेचे महत्त्वाचे केंद्र असून, या दर्जामुळे मंदिर परिसरात भाविकांसाठी आवश्यक सुविधा, पायाभूत विकास आणि धार्मिक पर्यटनाला मोठी चालना मिळेल. आदासा गणेश मंदिराचा विकास अधिक नियोजनबद्ध आणि व्यापक स्वरूपात करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. या निर्णयासाठी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले आहेत.

शासनाच्या या निर्णयामुळे आदासा गणेश मंदिराचा धार्मिक, सांस्कृतिक आणि पर्यटनदृष्ट्या विकास होण्यास मदत होणार आहे. यात्रेकरू आणि भाविकांसाठी आवश्यक सोयी-सुविधा, पायाभूत सुविधा तसेच परिसराच्या विकासासाठी उपलब्ध होणाऱ्या संधींच्या दृष्टीने या निर्णयाला विशेष महत्त्व आहे. भाविकांना उत्तम सुविधा मिळाव्यात आणि आदासाची ओळख राज्यातील प्रमुख तीर्थक्षेत्र म्हणून अधिक भक्कम व्हावी, यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील.

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा जनसंपर्क कार्यक्रम आज



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांचा जनसंपर्क कार्यक्रम उद्या, रविवार, दि. १३ सप्टेंबर २०२६ रोजी महाल येथील गडकरी वाडा येथे आयोजित करण्यात आला आहे. महालातील गडकरी वाडा येथे मा. मंत्री महोदय यांच्या जनसंपर्क कार्यालयात सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत हा कार्यक्रम होईल. या वेळेत मंत्री महोदय नागरिकांची निवेदने स्वीकारतील. मा. मंत्री महोदय नागरिकांना व्यक्तिशः भेटतील आणि त्यांच्याशी संवाद साधतील. नागरिकांनी आपल्या समस्या, अडचणी, मागण्या लेखी स्वरुपातच (आवश्यक कागदपत्रे जोडून) आणाव्यात. तसेच आपली लेखी निवेदने मा. मंत्री महोदयांना द्यावीत, असे आवाहन करण्यात आले आहे. त्यानंतर दुपारी १ ते २ या कालावधीत नितीन गडकरी आपल्या जनसंपर्क कार्यालयात भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांना भेटतील.

## भव्य तान्हा पोळा स्पर्धेचे २७ वे वर्ष संपन्न

### सुमारे १५० बालस्पर्धकांचा सहभाग, वेशभूषा व नंदीबैल सजावटीने वेधले लक्ष



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

अंतरराष्ट्रीय मानवाधिकार संगठन, भारत आणि प्रतिभा बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भव्य तान्हा पोळा स्पर्धेचे २७ वे वर्ष उत्साहात पार पडले. महाराष्ट्राच्या पारंपरिक संस्कृतीची ओळख बालकांना व्हावी, तसेच त्यांच्या कलागुणांना आणि सर्जनशीलतेला व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने दरवर्षी या स्पर्धेचे आयोजन केले जाते. यंदा सुमारे १५० बालस्पर्धकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. स्पर्धेत बालकांनी आकर्षक पारंपरिक वेशभूषा परिधान केली होती. तसेच नंदीबैलांची कलात्मक सजावट करून विविध सामाजिक संदेशही सादर करण्यात आले. वेशभूषा, नंदीबैल सजावट, सादरीकरण आणि सामाजिक संदेश या विविध निकषांवर परीक्षकांनी विजेत्यांची निवड केली. स्पधेर्तील प्रथम पुरस्कार सायकल आर्वीक तायवाडे यांना प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार व्ही.एन. रेड्डी यांच्या सौजन्याने देण्यात आला. द्वितीय पुरस्कार स्टडी टेबल आहाना इंदूरकर, तृतीय पुरस्कार चेअर ओवी देशमुख, चतुर्थ पुरस्कार क्रिकेट बॅट शिवांश सार्वे, पंचम पुरस्कार बॅडमिंटन रॅकेट दानीष गायकवाड आणि षष्ठम पुरस्कार फुटबॉल प्रभो दवंडे यांना देण्यात आला. सहभागी इतर बालकांनाही विविध आकर्षक पुरस्कार देऊन त्यांचा उत्साह वाढविण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजक विवेक मेंढी होते. कार्यक्रमाचे प्रमुख म्हणून रोहित श्रीवास्तव आणि मनोज लिल्होरे यांनी जबाबदारी सांभाळली.

यावेळी व्ही.एन. रेड्डी, अनुसया गुप्ता, अभय देशमुख, नगरसेवक दिलीप दिवे, नगरसेवक संजय उगले, माजी नगरसेवक प्रमोद तभाने तसेच प्रियासिंग चंदेल आणि आशिया हांडा यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, पदाधिकारी, पालक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. २७ वर्षांपासून सातत्याने आयोजित होणाऱ्या या स्पर्धेच्या माध्यमातून बालकांमध्ये महाराष्ट्राची संस्कृती, परंपरा आणि सामाजिक जाणीव रुजविण्याचा प्रयत्न केला जात आहे. यंदाच्या स्पधेर्लाही बालकांसह पालक व नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सहकार्य करणाऱ्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, स्वयंसेवक, पालक आणि नागरिकांचे आयोजक विवेक मेंढी यांनी आभार मानले.

## महिनाभराच्या खंडानंतर नरखेडवर मेघराजाची दमदार बरसात, खरीप पिकांना संजीवनी!

### दुपारी ४ वाजल्यापासून जोरदार पाऊस, सोयाबीन, कापूस, तुरीसह भाजीपाला पिकांना मोठा दिलासा, शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर फुलले समाधान

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

नरखेड तालुक्यात गेल्या महिनाभरापेक्षा अधिक काळापासून पावसाने ओढ दिल्यानंतर अखेर शनिवारी दुपारी ४ वाजताच्या सुमारास दमदार



पावसाला सुरुवात झाली. सुरुवातीला ढगाळ वातावरण निर्माण झाल्यानंतर जोरदार सरी कोसळल्याने तालुक्यातील शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला. पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या खरीप पिकांना या पावसाने मोठा दिलासा मिळाला असून, पिकांना नवसंजीवनी मिळाल्याचे चित्र शेतशिवारात पाहायला मिळाले. गेल्या अनेक दिवसांपासून पावसाने दडी मारल्यामुळे खरीप हंगामातील पिकांवर पाण्याच्या ताणाचे संकट निर्माण झाले होते. विशेषतः सोयाबीन पिकाला या काळात पावसाची अत्यंत आवश्यकता होती. फुलोरा व शेंगा भरण्याच्या अवस्थेत असलेल्या सोयाबीनला पावसाची प्रतीक्षा होती. त्यामुळे शनिवारी झालेला दमदार पाऊस सोयाबीनसाठी संजीवनी ठरला आहे.

कापूस, सोयाबीन, तूर, भाजीपाला तसेच अन्य खरीप पिकांसाठी हा पाऊस अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. पावसाअभावी जमिनीतील ओलावा कमी झाल्याने पिकांची वाढ मंदावली होती. आता झालेल्या पावसामुळे जमिनीत ओलावा निर्माण होऊन पिकांच्या वाढीस चालना मिळण्याची शक्यता आहे. यामुळे उत्पादनाच्या आशाही पुन्हा वाढल्या आहेत.

**हवामान अंदाजाची भविष्यवाणी ठरली खरी**

हवामान अंदाज तज्ञ पंजाब डंख यांनी नरखेड परिसरात पावसाची शक्यता व्यक्त केली होती. शनिवारी दुपारपासून प्रत्यक्षात दमदार पावसाला सुरुवात झाल्याने त्यांची भविष्यवाणी खरी ठरल्याची चर्चा शेतकरी वर्गात सुरू आहे. पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांसाठी हा पाऊस दिलासादायक ठरला आहे. दरम्यान, पावसामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असला तरी तालुक्यातील नदी-नाले, ओढे व विहिरींमध्ये अद्याप अपेक्षित पाणीसाठा झालेला नाही. त्यामुळे पाणीसाठ्यात वाढ होण्यासाठी आणखी जोरदार व सातत्यपूर्ण पावसाची गरज आहे. विहिरींच्या पाणीपातळीत वाढ झाल्यास आगामी रब्बी हंगामासाठीही शेतकऱ्यांना मोठा आधार मिळणार आहे. गेल्या काही दिवसांपासून पावसासाठी आभाळाकडे डोळे लावून बसलेल्या शेतकऱ्यांना शनिवारी बरसलेल्या पावसाने मोठा दिलासा दिला. पावसाचा जोर कायम राहून नदी-नाले वाहू लागावेत आणि विहिरींना पाणी यावे, अशी अपेक्षा आता शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे.

## रामटेक येथे पारंपरिक 'मारबत उत्सव' संपन्न, 'ईडा-पिडा घेऊन जा गे मारबत'च्या घोषणांनी दुमदुमला परिसर

### राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांच्या हस्ते मारबतीची विधिवत पूजा अर्चना

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

नागपूर जिल्ह्यासह रामटेक शहरात वर्षानुवर्षांची परंपरा असलेला ऐतिहासिक मारबत व बडग्या उत्सव यंदाही अत्यंत थाटामाटात आणि पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी निघणाऱ्या या मिरवणुकीत रामटेककरांचा उत्साह ओसंडून वाहत होता. 'इडा-पिडा, रोगराई घेऊन जा गे मारबत' अशा घोषणा देत अबालवृद्धांनी या उत्सवात सहभाग घेतला.

यावेळी राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांच्या हस्ते मारबतीची विधिवत पूजा अर्चना करण्यात आली.रामटेक शहरातील कुंभारपुरा नवयुवक मारबत उत्सव मंडळ, रामतलाई मारबत उत्सव मंडळ आणि श्री पिंपलेश्वर वॉर्ड येथील काली-पिली मारबत उत्सवाच्या मिरवणुका हे या वर्षीच्या महोत्सवाचे मुख्य केंद्र होते. बांबू, कागद आणि कापडापासून तयार केलेल्या



भव्य मारबती आणि समाजातील अनिष्ट प्रथांवर प्रहार करणारे उपरोधिक 'बडगे' (पुतळे) आकर्षणाचे केंद्र ठरले होते. या मंगल परंपरेचे साक्षीदार होण्यासाठी रामटेक परिसरातील हजारो नागरिकांनी रस्त्यांवर गर्दी केली होती.

राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांनी या काली-पिली मारबत उत्सवाच्या मिरवणुकीत हजेरी लावून रामटेकच्या जनतेला शुभेच्छा दिल्या. "या परंपरेमुळे सर्व संकटे दूर होऊन सर्वांच्या जीवनात सुख-समृद्धी नांदो," अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. या उत्सवात रामटेक नगरपरिषद चे नगराध्यक्ष बिकेंद्र महाजन, उपाध्यक्ष आलोक मानकर, सभापती सुमित कोठारी, विश्वास पाटील, संजय मुलमुले,महेश बिसन,दिपक धर्मिजवार, उमेश पटले,अविनाश कोल्हे, शुभम जथरे, राहुल गुंढरे यांच्यासह मारबत उत्सव समितेचे सदस्य व रामटेक शहरातील नागरिक प्रामुख्याने उपस्थित होते.

**सामाजिक संदेश आणि मदतीची हाक**

यंदाच्या मारबत उत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे केवळ अंधश्रद्धा आणि रोगराई दूर सारणे एवढाच उद्देश नव्हता, तर या माध्यमातून समाजोपयोगी संदेशही देण्यात आले. रामटेकच्या मार्बती उत्सवातून एका चिमुकल्या मुलीच्या (श्रीनिका) महागड्या उपचारासाठी निधी गोळा करण्याचे मदतीचे आवाहन करण्यात आले, ज्याला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. याशिवाय राजकीय, आर्थिक आणि स्थानिक समस्यांवर भाष्य करणारे मारबत- बडगे मिरवणुकीत लोकांचे लक्ष वेधून घेत होते.

# बेसा - पिपळाच्या सुरळीत पाणीपुरवठ्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करावी !

## पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे





**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
बेसा-पिपळा नगरपंचायत क्षेत्रातील पाणीपुरवठ्यातील अनियमितता टाळण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करून येथील नागरिकांना सुरळीत पाणीपुरवठा करण्याचे निर्देश जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज दिले.

बेसा-पिपळा नगरपंचायत पाणीपुरवठा योजनेचा आज सविस्तर आढावा त्यांनी घेतला. त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीस बेसा - पिपळाच्या नगराध्यक्षा कीर्ती बडोले, उपाध्यक्ष नरेश भोयर यांच्यासह जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, उपविभागीय अधिकारी वंदना सौरंगपते, भूमि अभिलेखचे जिल्हा अधीक्षक श्री मोहिते, मुख्याधिकारी भारत नंदनवार आदी उपस्थित होते.

पालकमंत्री म्हणाले, जलशुद्धीकरण केंद्रातून दूषित पाणीपुरवठा होऊ नये यासाठी पाणी सोडताना सतर्कता बाळगावी, बांधकामासाठी लागणाऱ्या पाण्याच्या अनधिकृत जोडण्या शोधून त्या तात्काळ खंडित कराव्यात व जलस्त्रोतापासून पाणी वाहून आणताना त्यात होणारा पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी उपाययोजना करावी.

या भागात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पाणीपुरवठा करण्यात येतो. परंतु येथील काही भागात नियमित पाणीपुरवठा होत नसून योग्य नियोजनातूनच कायमस्वरूपी उपाययोजना करता येणे शक्य असल्याचे पालकमंत्र्यांनी सांगितले. यासाठी जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त, एनएमआरडीए व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी समन्वयातून कार्यवाही करावी. नागरिकांना सुरक्षित, शुद्ध आणि पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने जलशुद्धीकरण केंद्रातील त्रुटी दूर करून मानकांनुसार नियमित शुद्ध पाण्याचा पुरवठा करण्यासह पाणीगळतीमुळे होणारा पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी तातडीने कृती आराखडा तयार करावा व त्याबाबतचा अहवाल मुदतीत सादर करण्याचे आदेश त्यांनी नगरपंचायत प्रशासनाला यावेळी दिले.

प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत मौजा पिपळा, घोगली, बेसा व बेलतरोडी येथील पट्टे वाटप तात्काळ पूर्ण करावे, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत नागरिकांसाठी पाणीपुरवठा, स्वच्छता, दिवाबत्ती, अशा मूलभूत सुविधांची निर्मिती करण्यात यावी. आयुष्मान कार्ड वाटपाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्याचे आदेशही त्यांनी दिले.

थोडक्यात

# नॅशनल इंग्लिश स्कूलमध्ये तान्हा पोळ्याचा उत्साह

## नंदीबैल सजावट अन् शेतकरी वेशभूषेत विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**
महाराष्ट्राच्या मातीत रुजलेली शेतीची परंपरा आणि शेतकरी संस्कृतीची विद्यार्थ्यांना ओळख व्हावी, या उद्देशाने मंगळवारी पेठ



येथील नॅशनल इंग्लिश स्कूल व लिटिल रोज नर्सरी येथे नुकताच तान्हा पोळा उत्साहात साजरा करण्यात आला. तान्हा पोळ्याच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी आकर्षक पद्धतीने नंदीबैल सजवून आणले होते. तसेच अनेक विद्यार्थ्यांनी पारंपरिक शेतकरी वेशभूषा परिधान करून कार्यक्रमात सहभाग घेतला. विविध रंगांनी, फुलांनी आणि पारंपरिक सजावटीने नटलेले नंदीबैल विद्यार्थ्यांच्या आकर्षणाचे केंद्र ठरले. विद्यार्थी तसेच पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा आनंद घेतला.

तान्हा पोळा हा केवळ सण नसून शेतकरी आणि बैल यांच्यातील जिव्हाळ्याचे नाते, शेतीशी असलेली बांधिलकी आणि महाराष्ट्राच्या ग्रामीण संस्कृतीचे दर्शन घडविणारा उत्सव आहे. विद्यार्थ्यांना या परंपरेची माहिती व्हावी आणि आधुनिक शिक्षणासोबत आपल्या मातीतल्या संस्कृतीचीही जाणीव निर्माण व्हावी, या उद्देशाने शाळेच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांच्या आकर्षक नंदीबैल सजावट व उत्कृष्ट शेतकरी वेशभूषेला शाळेच्यावतीने प्रोत्साहनपर बक्षिसे देण्यात आली. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापिका माधुरी उरकुडे, उपमुख्याध्यापिका रंजना जोधे, गजाला शेख, दीपा राऊ, प्रेमलता नंदनवार, मीनाक्षी जुमडे,प्रगती घुमडे, भाग्यश्री चनोरकर व पूजा शिवरकर यांनी परिश्रम घेतले.

# मंगळवारी प्राथमिक शाळेत तान्हा पोळा



**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**
नगर परिषद मंगळवारी प्राथमिक शाळेत तान्हा पोळ्याचे उत्साहात आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगर परिषद उमरेडच्या स्वच्छता व आरोग्य सभापती मा. वैष्णवी लाडेकर मॅडम होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून श्री. प्रकाश जुमडे सर उपस्थित होते. तान्हा पोळ्यानिमित्त विद्यार्थ्यांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला. विद्यार्थ्यांनी पोळ्याचे महत्त्व जाणून घेत या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला. यावेळी विद्यार्थ्यांना खाऊ व भेटवस्तूंचे वाटप करण्यात आले. तसेच लकी ड्रॉच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध बक्षिसे देण्यात आली.

शाळेचे मुख्याध्यापक किशोर श्रीरामे यांनी विद्यार्थ्यांना तान्हा पोळ्याचे महत्त्व, शेतकरी आणि बैल यांचे नाते तसेच भारतीय कृषी संस्कृतीतील पोळा सणाचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आशिष कामडी यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रशांत गिल्लूरकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सारिका जगताप ,आवेश मोहम्मद, पूजा थोटे, मीना मेंढूले यांच्यासह शाळेतील शिक्षक व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# सरस्वती नगरात तान्हा पोळा साजरा

## नंदीबैलांच्या आकर्षक सजावटीने रंगली पोळ्याची पारंपरिक शोभा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
सरस्वती नगर बहुउद्देशीय सेवा संस्थेच्या वतीने सरस्वती नगर परिसरात पारंपरिक तान्हा पोळा उत्सव मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी परिसरातील बालगोपालांनी आकर्षक पद्धतीने सजवून आणलेल्या नंदीबैलांमुळे



संपूर्ण परिसराला पारंपरिक उत्सवाचे मनोहारी स्वरूप प्राप्त झाले होते. तान्हा पोळ्यानिमित्त लहान मुलांनी आपल्या नंदीबैलांची आकर्षक सजावट केली होती. रंगीबेरंगी वस्त्रे, फुलांच्या माळा, विविध अलंकार आणि सुंदर सजावटीने नंदीबैल सजवून आणण्यात आले. त्यामुळे नंदीबैलांचे हे आगळेवेगळे रूप सर्वांचेच लक्ष वेधून घेत होते. कार्यक्रमात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सजवून आणलेल्या नंदीबैलांचे परीक्षण करण्यात आले. उत्कृष्ट सजावट आणि आकर्षक मांडणी करणाऱ्या बालगोपालांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसांचे वितरण करण्यात आले. याशिवाय विविध वेशभूषा व सजावट करून सहभागी झालेल्या लहान मुलांनाही प्रोत्साहनपर बक्षिसे देण्यात आली. या उत्सवामुळे बालगोपालांमध्ये विशेष उत्साह पाहायला मिळाला. पारंपरिक सण-उत्सवांची माहिती आणि संस्कृतीची ओळख नव्या पिढीला व्हावी, तसेच त्यांच्यामध्ये आनंद, उत्साह आणि सामाजिक सहभागाची भावना निर्माण व्हावी, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सरस्वती नगर बहुउद्देशीय सेवा संस्थेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कार्यक्रमाचे नियोजन आणि आयोजन करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. बालगोपालांचा उत्साह आणि आकर्षक सजविलेले नंदीबैल यामुळे तान्हा पोळ्याचा उत्सव अविस्मरणीय ठरला.

# मुंबईत आंदोलन करून कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करू नका!

## गणेशोत्सवाच्या काळात आंदोलन टाळण्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आवाहन, दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी सरकार सज्ज

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
मुंबईतील आंदोलनामुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. मुंबई उच्च न्यायालयाने दिलेले निर्णय लक्षात घेता सर्व आंदोलकांनी याची काळजी घ्यावी. राज्यातील सर्व आंदोलकांना माझी विनंती आहे की, सध्या मुंबईत आंदोलन करणे राज्याच्या दृष्टीने योग्य नाही. त्यातच मुंबई आणि महाराष्ट्रातील गणेशोत्सव हा देशातील सर्वांत मोठा उत्सव असून, या काळात कोणीही आंदोलन करू नये, असे आवाहन महसूलमंत्री तथा नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे नागपुरात प्रसार माध्यमांशी बोलत होते.

जरांगे आंदोलनाबाबत बोलताना बावनकुळे म्हणाले की, ओबीसी असो अथवा मराठा समाज, कोणाचाही हक्क डावलता येणार नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठा समाजाच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. इतिहासात यापूर्वी न घेतलेले अनेक निर्णय या दोन्ही नेत्यांनी घेतले आहेत. मात्र, त्यांच्यावर करण्यात येणारी टिप्पणी महाराष्ट्राला आणि समाजाला मान्य होणारी नाही.

आजवर मराठा समाजाला जो न्याय मिळाला, त्यातील महत्त्वाचे निर्णय देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्या कार्यकाळात झाले आहेत. आमचे सरकार मराठा समाजाला न्याय देण्याच्या भूमिकेत काम करत आहे. त्यामुळे सरकारला थोडा वेळ दिला पाहिजे, असेही बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

दुष्काळाची परिस्थिती सरकारसाठी सर्वाधिक महत्त्वाची
दरम्यान, राज्यातील दुष्काळसदृश परिस्थितीबाबत बोलताना बावनकुळे म्हणाले की, सध्या कोणाच्या आंदोलनाच्या भूमिकेपेक्षा महाराष्ट्रातील दुष्काळाची परिस्थिती सर्वाधिक महत्त्वाची आहे. राज्यातील सुमारे १८ जिल्ह्यांमध्ये पावसाचे प्रमाण कमी आहे. अनेक ठिकाणी पिके करपत आहेत. याबाबत काल सर्व जिल्हाधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली असून, आज पुन्हा सायंकाळी चार वाजता सर्व जिल्हाधिकाऱ्यांसोबत बैठक होणार आहे.

शेतकऱ्यांना दुष्काळाच्या काळात कशी मदत करता येईल, त्यांच्या पाठीशी सरकार ठामपणे कसे उभे राहील आणि शेतकरी आत्महत्या करण्याची वेळ येऊ नये, याला सरकारचे सर्वोच्च प्राधान्य असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील दुष्काळाच्या परिस्थितीकडे जाणीवपूर्वक लक्ष देण्याच्या सूचना दिल्या आहेत. मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी मला आणि मुख्य सचिवांना राज्यातील परिस्थितीचे तातडीने सर्वेक्षण सुरू करण्याच्या सूचना दिल्या आहेत. जिल्हानिहाय परिस्थितीचा आढावा घेऊन आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. शासनाच्या नियमावलीनुसार शेतकऱ्यांना आवश्यक ती मदत करण्याची सरकारची भूमिका आहे, असे बावनकुळे म्हणाले. राज्यातील संपूर्ण परिस्थितीचा आढावा घेतल्यानंतर तो आगामी मंत्रिमंडळ बैठकीत मांडण्यात येईल. येत्या मंगळवारी राज्यातील परिस्थितीचा सविस्तर आढावा मुख्यमंत्र्यांना देणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी, पालकमंत्री आणि प्रशासनातील संबंधित यंत्रणा प्रत्यक्ष पाहणी करणार असून, आपणही काही ठिकाणी भेटी देणार आहोत. त्यानंतर संपूर्ण परिस्थितीचा आढावा मंत्रिमंडळासमोर मांडण्यात येईल, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

**ओयो हॉटेल्सवर पोलिसांची कडक नजर**
नागपूर शहरातील ओयो हॉटेल्सबाबतही बावनकुळे यांनी चिंता व्यक्त केली. ते म्हणाले की, शहरात प्रत्येक दोन हॉटेल्सच्या आसपास ओयोचा बोर्ड दिसत आहे. या हॉटेल्सच्या परिसरातील नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात तक्रारी प्राप्त होत आहेत. याबाबत पोलीस आयुक्तांसोबत चर्चा करण्यात आली असून, मुख्यमंत्र्यांनाही याची माहिती देण्यात आली आहे. मुख्यमंत्र्यांनीही या विषयाची गांभीर्याने दखल घेतली आहे.

पोलीस आयुक्तांनी ओयो हॉटेल्ससाठी कडक नियमावली तयार केली आहे. आता अशा हॉटेलमध्ये येणाऱ्या-जाणाऱ्या ग्राहकांची आवश्यक नोंद व रेकॉर्ड ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे. ओयो हॉटेल्सवर पोलिसांची कडक नजर राहणार असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई केली जाईल. नागपूर शहराची सांस्कृतिक व सामाजिक परंपरा बिघडणार नाही, याची काळजी घेण्याच्या दृष्टीने ही नियमावली करण्यात आली असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.

# ताथवडे शाळेत विद्यार्थ्यांनी अनुभवली संपूर्ण निवडणूक प्रक्रिया




**दै. सिंहवाणी वृत्त, पुणे**
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ताथवडे येथे विद्यार्थ्यांनी बाल संसद निवडणूक २०२६ अंतर्गत संपूर्ण निवडणूक प्रक्रियेचा अनुभव घेतला. उमेदवारी अर्ज दाखल करण्यापासून प्रचार, मतदान, मतमोजणी आणि निकाल ही संपूर्ण प्रक्रिया समजून घेतली. शाळेतील एकूण २४ उमेदवारांपैकी २३ उमेदवारांची निवड करून विद्यार्थी मंत्रिमंडळ करण्यात आले.

ताथवडे शाळेत विद्यार्थ्यांना निवडणूक प्रक्रिया समजण्यासाठी बाल संसद उपक्रमांतर्गत संपूर्ण निवडणूक प्रक्रिया घेण्यात आली. यात अर्ज दाखल करणे, निवडणूक चिन्ह, प्रचार, मतदान आणि मतमोजणी या सर्व प्रक्रिया विद्यार्थ्यांनी स्वतः अनुभवल्या. शाळेत एकूण २४ उमेदवारांपैकी १२ उमेदवारांची निवड करण्यात आली. अतिशय पारदर्शक झालेल्या या निवडणुकीत एकूण पावणे चारशे मतदारांनी मतदान केले असल्याची निवडणूक निर्णय अधिकारी अथर्व शेलार आणि श्रेया गोरे यांनी सांगितले.

सार्थक कसबे, सानिध्य कापसे, समृद्धी वाघमारे, माऊली जाधव साईराज मोरे अल्फिया मुलानी, सम्यक कांबळे, दानिश शेख, अनुष्का पुंडे, प्राची गौतम, निहाल सरोज, संस्कृती मिसाळ आणि श्रुती जामनिक या विजयी उमेदवारांची ढोल आणि ताशांच्या गजरात गावातून मिरवणूक काढण्यात आली. यावेळी या सर्व विजयी उमेदवारांना मुख्याध्यापक आणि शिक्षकांनी शालेय भेटवस्तू देऊन त्यांचे अभिनंदन केले.

यावेळी मुख्याध्यापक संगिता सूर्यवंशी, कविता मोहिते, भारती जाधव, जयश्री दांगडे, सारिका भालेकर, शिवप्रसाद गुट्टे, प्रिती चव्हाण आणि साहित्यिक शिक्षक सचिन बेंडभर उपस्थित होते. मारुंजी केंद्राचे केंद्रप्रमुख सुरेश साबळे यांनी या उपक्रमाचे कौतुक केले आहे. गटशिक्षणाधिकारी संग्राम पाटील आणि गटविकास अधिकारी सुधीर भागवत यांनी निवडून आलेल्या विद्यार्थी उमेदवारांचे अभिनंदन केले आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साहित्यिक शिक्षक सचिन बेंडभर यांनी केले. तर मुख्याध्यापक संगिता सूर्यवंशी यांनी आभार मानले.

# खाण उद्योगाला नव्या दिशेने नेण्याची गरज : डॉ. हेमंत शरद पांडे

## खाण अभियंत्यांच्या ३६व्या राष्ट्रीय अधिवेशनाचा थाटात समारोप

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
खाण क्षेत्राची आगामी वाटचाल अधिक तंत्रज्ञानाधारित आणि विविधांगी असेल. महत्त्वपूर्ण खनिजे, दुर्मिळ पृथ्वी मूलद्रव्ये, भूमिगत खाणकाम तसेच कोळशाच्या विविध उपयोगांवर भर देत खाण उद्योगाला नव्या दिशेने नेण्याची गरज आहे. पुढील पिढीतील खाण अभियंत्यांसाठी ही वाटचाल आव्हानात्मक असली, तरी तितकीच संधीपूर्ण असेल, असे वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेडचे (डब्ल्यूसीएल) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. हेमंत शरद पांडे यांनी सांगितले.

द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया)च्या नागपूर लोकल सेंटरतर्फे हॉटेल रॅडिसन ब्ल्यू येथे आयोजित खाण अभियंत्यांच्या ३६व्या राष्ट्रीय अधिवेशनाचा आणि 'मायनिंग फॉर विकसित भारत @2047' या विषयावरील राष्ट्रीय परिसंवादाचा शनिवारी थाटात समारोप झाला. भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षणाच्या महासंचालक वर्षा आगलावे आणि डॉ. हेमंत पांडे समारोप सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

डॉ. पांडे म्हणाले की, खाण उद्योगाची पुढील वाटचाल पारंपरिक खाणकामापुरती मर्यादित राहणार नाही. महत्त्वपूर्ण खनिजे आणि दुर्मिळ पृथ्वी मूलद्रव्यांचा शोध व उत्खनन, तसेच कोळशाच्या विविध उपयोगांवर भर देणे आवश्यक आहे. या क्षेत्रात काम करणाऱ्या खाण अभियंत्यांसाठी येणारा काळ नवी आव्हाने आणि संधी घेऊन येणार आहे.

डब्ल्यूसीएलच्या माजरी परिसरात कोळसा गॅसिफिकेशनसाठी तयारी सुरू आहे. हा प्रकल्प २०२८-२९ पासून कार्यान्वित होण्याची अपेक्षा असून, त्यातून कोळशाच्या विविधांगी वापराच्या दिशेने नवा अध्याय सुरू होईल. खाण उद्योगाने अशा नव्या तंत्रज्ञानाचा आणि संधींचा स्वीकार करण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षणाच्या महासंचालक वर्षा आगलावे यांनी अधिवेशनाच्या यशस्वी आयोजनाबद्दल आयोजकांचे अभिनंदन केले. 'मायनिंग फॉर विकसित भारत' ही संकल्पना देशाच्या आर्थिक विकासाशी आणि पायाभूत सुविधांच्या विस्ताराशी थेट जोडलेली आहे, असे त्यांनी नमूद केले. जीएसआयकडून देशातील खनिज संसाधनांचा शोध, त्यांचे मूल्यांकन आणि विकासासाठी सुरू असलेल्या विविध उपक्रमांची माहिती त्यांनी दिली. खाण क्षेत्रात तंत्रज्ञान झपाट्याने बदलत असून, डेटा विश्लेषण,



कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ऑटोमेशनमुळे नव्या संधी निर्माण होत आहेत. मात्र, तंत्रज्ञानाचा वापर करताना पर्यावरणीय आणि सामाजिक जबाबदारीही तितक्याच गांभीर्याने जपली पाहिजे. अधिवेशनामुळे विद्यार्थी, संशोधक, खाण अभियंते आणि उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांना संवादाचे व्यासपीठ मिळाले असून, या संवादातून भविष्यातील खाण क्षेत्र अधिक सक्षम होईल, असे त्या म्हणाल्या.

आयोजन समितीचे अध्यक्ष डॉ. संदीप शिरखेडकर यांनी प्रास्ताविकात 'नागपूर डिक्लरेशन' तयार करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले. बंद झालेल्या खाणींच्या ठिकाणी उद्योगांसाठी तसेच भूमिगत खाण यंत्रसामग्रीशी संबंधित उपक्रमांसाठी आवश्यक पायाभूत सुविधा विकसित करता येऊ शकतात. त्यातून विदर्भात रोजगारनिर्मिती आणि कौशल्य विकासाला चालना मिळू शकते, असे त्यांनी स्पष्ट केले.

एमईसीएलचे सीएमडी आय. डी. नारायण यांनी हे अधिवेशन केवळ दोन दिवसांचा कार्यक्रम नसून ही नवी सुरुवात आहे. येथे झालेली चर्चा, तंत्रज्ञानाचे ज्ञान आणि विचारांची देवाणघेवाण प्रत्यक्ष कामात उतरल्यास देशाच्या खनिज व ऊर्जा सुरक्षेला त्याचा मोठा फायदा होईल, असे त्यांनी नमूद केले.

अधिवेशनाचे संयोजक डॉ. अनुपम खेर यांनी दोन दिवसांच्या कार्यक्रमाचा आढावा घेतला. ते म्हणाले, या अधिवेशनात देशभरातून सुमारे ५०० प्रतिनिधी सहभागी झाले, तर ४० तांत्रिक संशोधन निबंध सादर करण्यात आले. खाण क्षेत्राशी संबंधित २५ स्टॉल्सचे प्रदर्शनही भरविण्यात आले. याशिवाय, क्रिटीकल मिनरल्स वरील पॅनल डिस्कशन आणि विविध सत्रात मिळालेले मार्गदर्शन भविष्यात उपयुक्त ठरेल, असे ते म्हणाले.

डॉ. श्रीकांत आणि डॉ. जी. प्रफुल्ल कुमार यांना बेस्ट पेपर प्रेझेंटेशन अवॉर्ड प्रदान करण्यात आला. याशिवाय स्टार परफॉर्मर, प्रायोजक आणि एक्झिबिटर यांचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आसावरी गलांडे-देशपांडे यांनी केले. आयोजन सचिव जयंत जोशी यांनी आभार मानले.

थोडक्यात

## जवाहरनगर महादुला येथे मनोज पवार मित्रमंडळकडून तान्हा पोळा उत्सव साजरा



**दै. सिंहवाणी वृत्त, कोराडी**

जवाहरनगर महादुला येथे साधारणपणे शुक्रवार ४.३०वाजता तान्ह्या पोळ्याचे आयोजन करण्यात आले. महादुला कोराडी वसाहतीच्या फेन्सिंग जवळील गारी कष्टकरी वंचितांच्या वस्तीत मनोज पवार या नवतरुणाने पोळा उत्सव मोठ्या थाटात साजरा केला. लहान मुलांना छान सुंदर असे नंदी घेऊन तोरणे सजवले होते, उत्तमप्रकारे झाडत्या गायन झाले यावेळी मनोज युवा ब्रिगेड चे अध्यक्ष मनोज पवार शंकर पवार, विजय पवार, अजय इटनका राम इटनकर यांनी सर्वप्रथम सगळ्या नंदी बैलांची पूजा केली सर्व मुलांना खाऊवाटप झाला या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी राजू पवार, अक्षय विटकर, अमोल इटकर, विकास वीटकर, सुभाष डुकरे, सागर डुकरे, राजेश कुरडकर, दादू कर्डुलकर, अमित पवार कैलास लष्करे, शंकर डुकरे, नैतिक पवार, संदीप कुरळकर, चौहान झाखणीकर, लकी कुरळकर, निलेश लष्करे, आणि परिसरातील मोठ्याप्रमाणात नागरिक आणि लहान मुलांचे पालकवर्ग उपस्थित होते.

## ढोल-ताशांच्या गजरात 'नवसाला पावणारा अंबाझरीचा मोरया'चे भव्य आगमन, फायरवर्क्स शो ठरला आकर्षण



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

अंबाझरी परिसरातील गणेशभक्तांचे श्रद्धास्थान बनलेल्या स्वराज्य गणेशोत्सव मंडळाच्या 'नवसाला पावणारा अंबाझरीचा मोरया २०२६' यांचा भव्य आगमन सोहळा शनिवारी सायंकाळी लक्ष्मी भवन चौक येथे ढोल-ताशांच्या गजरात जल्लोषात पार पडला. गणरायाच्या आगमनाने परिसर भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात न्हाऊन निघाला. आगमन जल्लोष यात्रेदरम्यान ढोल-ताशा पथकाच्या दणदणाटासह भाविकांनी आणि युवकांनी मोठ्या उत्साहात गणरायाचे स्वागत केले. यावेळी आयोजित करण्यात आलेला विशेष 'फायरवर्क्स शो' हे सोहळ्याचे प्रमुख आकर्षण ठरले. आतषबाजीच्या रंगीबेरंगी रोषणाईने परिसर उजळून निघाला. या आगमन सोहळ्यास स्वराज्य मंडळाचे अध्यक्ष पृथ्वीराज सपकाळ यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी रोहन चरडे, सूरज वानखेडे, श्रेयश कुंभलकर, जनक मालविया, मंथन बावने, ओमकार गोतमारे, विश्वराज सपकाळ आणि सौम्य देशमुख उपस्थित होते. आगमन सोहळ्यानंतर सीसी टर्फच्या बाजूला, अंबाझरी हिल टॉप, नागपूर येथे गणरायाची विधिवत स्थापना करण्यात येणार आहे. आगामी गणेशोत्सवात विविध धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे मंडळाच्यावतीने सांगण्यात आले.

## पीएम श्री जि.प. उच्च प्राथमिक शाळा दहेगाव येथे तान्हा पोळा उत्साहात साजरा



**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू-मौदा**

पीएम श्री जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा दहेगाव येथे बैल पोळा सणानिमित्त तान्हा पोळा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गट ग्रामपंचायत दहेगावच्या सरपंच भारती संदिप आंबीलढुके होत्या, तर प्रमुख पाहुणे म्हणून शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नितेश इंगळे उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी लाकडी व मातीचे सजवलेले नंदी बैल व आकर्षक बैलगाडी आणली होती. बैलांना झूल, बाशिंग, घुंगरू माळा व फुलांनी सजवून त्यांची विधिवत पूजा व औक्षण करण्यात आले. शाळेचा परिसर फुगे व आंब्याच्या तोरणांनी सजवण्यात आला होता.

मुख्याध्यापक वासुदेव भुते यांनी विद्यार्थ्यांना बैल पोळा सणाचे महत्त्व, शेतीतील बैलांचे योगदान आणि शेतकरी-बैलाचे अतूट नाते याबद्दल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षकवृंद सुधीर खंडाईत, सुधीर कांबळे, राजेश रोहाड, सुजाता बोदेले, प्रज्ञा रामटेके संगीता आंबीलढुके, ज्योती आंबीलढुके, पुष्पा उके, उमेश उके, रंजना उके यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला पालक, ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.,

## ललिता रामराव जाधव यांचे निधन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



जानकी नगर मानेवाडा रिंग रोड नागपूर येथील प्लॉट नं. १०९ निवासी सौ. ललिता रामराव जाधव वय ५४ वर्ष यांचे आज शनिवारी १२ सप्टेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. उद्या दि.१३ सप्टेंबर रविवारी ११ वाजता. वाशिम जिल्हयातील कारंजा लाड़ जवळील वडगांव इजारा या त्यांच्या गावी त्यांचे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे.

# भाषांमधील परस्पर संवादातून समृद्ध होते साहित्य : अनुप कुमार

### हिंदी भाषा दिनानिमित्त विदर्भ साहित्य संघात कवींच्या संवेदनशील कवितांना दाद

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

भाषेला केवळ शासकीय चौकटीत न बांधता एकमेकांना जोडणारी 'जनभाषा' म्हणून स्वीकारणे गरजेचे आहे. साहित्य हे सभोवतालच्या सामाजिक वास्तवाशी जोडलेले असावे, असे सांगत कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी विभागीय आयुक्त व हिंदीतील नामवंत कवी अनूप कुमार अलाहाबाद येथील साहित्यिक वातावरण आठवणींना उजाळा दिला.



हिंदी भाषा दिनानिमित्त विदर्भ साहित्य संघातर्फे हिंदी-मराठी भाषेतील कवींचे विशेष कविसंमेलन शनिवारी विष्णुजी की रसोई परिसर, काचीपुरा, नागपूर येथे आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. प्रसिद्ध कवी व लेखक डॉ. तीर्थराज कापगते यांच्यासह दैनिक भास्करचे संपादक मणिकांत सोनी तसेच विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी यांची विशेष उपस्थिती होती.

यावेळी अनूप कुमार यांनी 'जग नावाचं एक छोटंसं गाव' आणि नर्मदा विस्थापित-कुपोषित बालकांच्या अनुभवांवर आधारित 'अफीम' ही हिंदी दीर्घकविता सादर केली. नागपूरच्या बहुभाषिक संस्कृतीचा उल्लेख करत त्यांनी मराठी-हिंदी संवादाचे महत्त्व अधोरेखित केले.

डॉ. तीर्थराज कापगते यांनी 'संवेदना' ही कविता सादर केली. कविता ही केवळ भाषेपुरती मर्यादित नसून संवेदना हेच तिचे मूलद्रव्य असल्याचे त्यांनी सांगितले. आधुनिक आभासी युगात निसर्गाशी माणसाची नाळ तुटत चालल्याने त्याच्या संवेदना बधिर होत असून, स्वतःशी असलेला निवांत संवादही हरवत चालल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

कविसंमेलनात रिमा चड्ढा यांनी कितने जमाने हो गए ही कविता सादर केली. तर उमेश यादव यांनी "१४ फरवरी से 23 मार्च" ही क्रांतिकारी विचारसरणीची कविता सादर केली. किरण काशिनाथ? यांनी "बेटी तुम्हारे लिये" सादर केली. या कवितेतून त्यांनी सांगितले की मुलींना किती गरजेच आहे स्वतःच्या ठामपणे उभे राहणे किती आवश्यक आहे. डॉ. अश्विनी बरबटे यांनी "आज कुछ पर शांत बैठी तो" ही कविता सादर केली. त्यांनी मनात चालणारे अर्थव्यवस्थ विचार मांडले. माया नरसापूरकर यांनी राधाकृष्ण वर आधारित "कळी खुलेना" ही कविता सादर केली. धनश्री धारकर यांनी "कसे बोलू शकतो आपण" ही कविता सादर केली तर अमोल बावकर यांनी "लड्डू की थाल" ही कविता सादर केली.

डॉ. अमृता इंदूरकर यांनी "बेदखल सवेरे" ही कविता सादर केली या कवितेमध्ये त्यांनी स्वप्नांचे वर्णन केले की स्वप्न किती खरे वाटू शकतात. आणि जयश्री दाणी यांनी "रंग स्त्रियांच्या आयुष्यातला" या कवितेमध्ये त्यांनी स्त्रियांच्या जीवनामध्ये विविध रंग भाषा यातून मांडले. तुषार जोशी यांनी एका स्त्रीच्या सौंदयार्चे वर्णन करणारी "चिंता" ही कविता सादर केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन शुभदा फडणवीस यांनी केले तर प्रास्ताविक बाळ कुळकर्णी यांनी केले.

## अभ्यंकर चौकात बैल पोळा व तान्हा पोळ्याचा जल्लोष

### ४०० हून अधिक नंदी बैलधारकांचा सहभाग, हजारो नागरिकांनी अनुभवला ग्रामीण संस्कृतीचा जागर

**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

सजवलेले नंदी बैल, पारंपरिक वेशभूषेतील बालगोपाल, ढोल-ताशांचा उत्साह आणि आपल्या लाडक्या नंदीला घेऊन आलेल्या चिमुकल्यांची लगबग... अशा उत्साहपूर्ण वातावरणात अभ्यंकर चौक, इतवारी पेठ येथे अभ्यंकर पोळा उत्सव समितीच्या वतीने भव्य बैल पोळा व तान्हा पोळा उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. विशेष म्हणजे यंदाच्या तान्हा पोळ्याला ४०० हून अधिक लाकडी नंदी बैलांसह बालगोपालांनी सहभाग घेतला, तर हजारो नागरिकांनी उपस्थित राहून या सोहळ्याचा आनंद लुटला.



बैल पोळा हा केवळ सण नसून शेतकऱ्यांच्या जीवनात वर्षभर साथ देणाऱ्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची महाराष्ट्राची समृद्ध परंपरा आहे. शेतकरी आपल्या बैलांना सजवून त्यांची पूजा करतात. याच संस्कृतीची ओळख पुढील पिढीला व्हावी आणि बालगोपालांमध्ये ग्रामीण जीवनशैली, शेती व बैलांविषयी प्रेम निर्माण व्हावे, या उद्देशाने तान्हा पोळ्याचे आयोजन करण्यात आले.

यावेळी विविध रंगांनी सजवलेले लाकडी नंदी बैल घेऊन मोठ्या संख्येने चिमुकले सहभागी झाले होते. आपल्या नंदीला आकर्षक सजावट करून आणण्यासाठी बालगोपाल व पालकांनी विशेष मेहनत घेतल्याचे दिसून आले. त्यामुळे संपूर्ण अभ्यंकर चौकाला जणू ग्रामीण संस्कृतीचे आकर्षक रूप प्राप्त झाले होते.

**लकी ड्रॉतून १०० बक्षिसे**

उत्सवात सहभागी झालेल्या सर्व बालगोपालांना भेटवस्तू व खाऊचे वाटप करण्यात आले. तसेच लकी ड्रॉच्या माध्यमातून जवळपास १०० बक्षिसांचे वितरण करण्यात आले. उत्कृष्ट नंदी बैल, आकर्षक सजावट तसेच उत्कृष्ट वेशभूषा अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते रोख रक्कम व आकर्षक बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाला नगरसेवक जितेंद्र रेवतकर, ज्ञानेश्वर शेगावकर, प्रकाश गजभिये, मधुकर जुनघरे, आनंदराव घुमडे, सुरेश गजभिये, योगेश भोले, हरीश लाडेकर, हरीश पौणीकर, संजय घुगुसकर व सारंग लाडेकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन राजू चाचरकर यांनी केले. उत्सवाच्या यशस्वितेसाठी साहिल गिरडकर, कपिल अड्याळवाले, किशोर पाटील, स्वप्नील लाडेकर, संजय चाचरकर, सचिन चाचरकर, राजू सोयरे, अशोक चाचरकर, अक्षय नंदनवार, महेश हेडाऊ, अतुल देव्हारे, प्रफुल भोयर, उमेश चाचरकर, रोशन चिमूरकर, सागर देव्हारे, हितेश रेवतकर, संजय लाडेकर, साई नंदनवार, साहिल बोकडे, प्रणय जुनघरे, नारायण जांभूळे व हिमांशु सहारे यांच्यासह समस्त नागरिकांचे सहकार्य लाभले.

बालगोपालांचा उत्स्फूर्त सहभाग आणि नागरिकांची मोठी उपस्थिती यामुळे अभ्यंकर चौकातील तान्हा पोळा हा उमरेडच्या सांस्कृतिक परंपरेतील लक्षवेधी सोहळा ठरला.

## इको दरीत कोसळून दोघांचा मृत्यू

**मंचर :** पत्नीला प्रसूतीसाठी करंजविहिरे येथे सोडून नातेवाईकाला भेटण्यासाठी निघालेल्या दोघांचा इको मोटार वीस फूट खोल खड्ड्यात कोसळून मृत्यू झाला. पुणे-नाशिक महामार्गावरील मंचर बायपासच्या मोरडेवाडी हद्दीत ही दुर्घटना घडली. या अपघातात आनंदराव शंकर कोळेकर (वय ५३, रा. करंजविहिरे) आणि किरण बाबुराव डुंबरे (वय ३५, रा. दावडी) यांचा मृत्यू झाला. दोघेही नातेवाईक होते. किरण डुंबरे यांच्या पत्नीला प्रसूतीसाठी करंजविहिरे येथे सोडल्यानंतर दोघे एमएच १४ एचडब्ल्यू ४३२७ क्रमांकाच्या इको गाडीतून आळेफाटा येथे उपचार घेत असलेल्या नातेवाईकाला भेटण्यासाठी निघाले होते. मोरडेवाडी हद्दीत भरधाव इको गाडी रस्त्यालगतच्या सुमारे वीस फूट खोल खड्ड्यात कोसळली.

## सालेकसा येथे सार्वजनिक गणेश उत्सव मंडळाचा भक्तिमय उपक्रम

### दररोज भाविकांसाठी महाप्रसादीचे आयोजन, भाविकांनी लाभ घेण्याचे मंडळाचे आवाहन

**दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा**

सालेकसा नगरपंचायत जवळील बाजार चौक येथे सार्वजनिक गणेश उत्सव मंडळाच्या वतीने यंदा तिसऱ्या वर्षी गणेशोत्सव मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात येत आहे. मंडळाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही गणेशभक्त व भाविकांसाठी दररोज सायंकाळी प्रसादी (भोजन)चे आयोजन करण्यात आले आहे. या प्रसादीचा परिसरातील भाविक मोठ्या श्रद्धेने लाभ घेत आहेत.



दि. १४ सप्टेंबर २०२६ रोजी श्री गणेशाची विधिवत स्थापना करण्यात येणार असून, त्यानंतर संपूर्ण गणेशोत्सव काळात विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. दररोज सायंकाळी आयोजित करण्यात येणाऱ्या प्रसादीमुळे गणेशभक्तांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. सार्वजनिक गणेश उत्सव मंडळाच्या वतीने सर्व भाविक भक्तांनी गणेशदर्शनासाठी उपस्थित राहून प्रसादीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

या मंडळाचे मार्गदर्शक राजेंद्र बागडे, अध्यक्ष राजु फुंडे, उपाध्यक्ष सुनील हत्तीमारे, सचिव हेमंत शर्मा, सहसचिव ईश्वर चुटे, कोषाध्यक्ष अशोक कटरे, मंडळ प्रमुख देवेंद्र कटरे, सदस्य दिनेश असाटी, विसर्जन प्रमुख भूमेश्वर एकुलकर यांच्यासह सदस्य रामदास चुटे, विद्याकुमार बहेकार, कृष्णा बनोठे, आकाश श्रीवास्तव, महेंद्र पटले, राजु रोकडे, राजु वरहाडे, हेमराज वरहाडे, हेमेंद्र बघेले, नूरसिंह हरिनखेडे, बापू बिसेन, रंजू कटरे, संदीप दुबे, राजु येटरे, पटले सर, मोहबे सर, लालचंद तांडेकर, पुरुषोत्तम फुन्ने, वासनिक जी, युगल कटरे, गुलाब हत्तीमारे, विवेक नागपुरे, ड्रा., धवल बघेले, आदित्य गोलिवार, दिलीप तिवारी, विजय मिश्रा, राहुल साठवने व विक्की श्रीवास्तव, पुरषोत्तम माहरवाड़े विनोद चकोले, आदी मंडळाच्या पदाधिकारी व सदस्यांचे सहकार्य लाभत आहे. गणरायाच्या चरणी श्रद्धेने नतमस्तक होऊन प्रसादीचा लाभ घ्यावा व गणेशोत्सव आनंद, भक्ती आणि सामाजिक एकोप्याने साजरा करावा, असे आवाहन सार्वजनिक गणेश उत्सव मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

## राज्यात पावसाचा जोर वाढणार

**मुंबई :** बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्राचा परिणाम राज्यातील हवामानावर होणार असून, राज्यात पुन्हा पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. पुढील दोन दिवस राज्यातील विविध भागांत पावसाची तीव्रता कायम राहणार असून, रविवारी उत्तर महाराष्ट्रात मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, कोकणात १२ ते १६ सप्टेंबरदरम्यान मुसळधार पाऊस होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या भागातील नागरिकांना सतर्क राहण्याचा इशारा देण्यात आला आहे.



मध्य महाराष्ट्रात १२ आणि १३ सप्टेंबर रोजी मुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज आहे. मराठवाड्यात १२ सप्टेंबर रोजी काही भागांत मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता असून, विदर्भात १२ सप्टेंबर रोजी मुसळधार, तर १३ आणि १४ सप्टेंबर रोजी मध्यम पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. दरम्यान, कमी दाबाच्या क्षेत्रामुळे पावसाचे पुनरागमन झाल्याने राज्यातील अनेक भागांत ढगाळ वातावरण आणि पावसाच्या सरी पाहायला मिळण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी मुसळधार पावसामुळे स्थानिक पातळीवर पाणी साचण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## झाडाखाली रंगला जुगार, जलालखेडा पोलिसांची धाड!

### सहा जुगाऱ्यांना रंगेहात अटक, पाच दुचाकींसह ३ लाख ११ हजार ३९५ रुपयांचा मुद्देमाल जप्त

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

पोळा सणाच्या पार्श्वभूमीवर अवैध धंद्यांविरोधात जलालखेडा पोलिसांनी कारवाईची धडक मोहीम सुरू केली असून, शुक्रवारी मौजा दावसा ते साखरखेडा मार्गालगत झाडाखाली सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर पोलिसांनी धाड टाकून सहा जणांना रंगेहात अटक केली. या कारवाईत रोख रक्कम, ५२ ताशपत्ते, पाच मोटारसायकली व इतर साहित्य असा एकूण ३ लाख ११ हजार ३९५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



जलालखेडा पोलिसांना दावसा ते साखरखेडा जाणाऱ्या रस्त्यालगत सार्वजनिक ठिकाणी काही इसम ताशपत्त्यांवर जुगार खेळत असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. माहितीची खातरजमा करून पोलिसांनी तत्काळ पथकासह घटनास्थळी धाड टाकली. पोलिसांची चाहूल लागताच जुगार खेळणाऱ्यांमध्ये एकच खळबळ उडाली. मात्र, पोलिसांनी सर्वांना घेराव घालत सहा जणांना ताब्यात घेतले.

या कारवाईत अरमानसिंग मानसिंग टाक (३४, रा. बानोरचंद्र), पवन राजपूत जुडपे (२९, रा. पिंपळधरा), मनोज दिवाकर टेकाम (३२, रा. दावसा), संजय ज्ञानेश्वर पाटील (३३, रा. पिंपळधरा), अविन लक्ष्मणराव सहारे (३२, रा. पिंपळधरा) आणि सतवंतसिंग मनोहरसिंग बावरी (३८, रा. बानोरचंद्र) यांना अटक करण्यात आली.

पंचासमक्ष घेतलेल्या झडतीत आरोपींच्या ताब्यातून १ हजार ३४५ रुपये रोख, ५२ ताशपत्ते, पाच मोटारसायकली आणि इतर साहित्य जप्त करण्यात आले. जप्त मुद्देमालाची एकूण किंमत ३ लाख ११ हजार ३९५ रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

या प्रकरणी आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम कलम १२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास जलालखेडा पोलिस करीत आहेत. ठाणेदार विनोद जांभळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक माया वैश्य, मोरेश्वर चलपे यांच्यासह पोलिस कर्मचारी व होमगार्ड यांनी ही कारवाई केली.

दरम्यान, पोळा सणाच्या पार्श्वभूमीवर जलालखेडा पोलिसांकडून अवैध धंद्यांविरोधात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. पोलिस स्टेशन जलालखेडा हद्दीत पोळा सणानिमित्त प्रोहिबिशनच्या १६, जुगाराच्या २ आणि एनडीपीएस कायद्यानुसार १ कारवाई करण्यात आली आहे. त्यामुळे अवैध धंदे करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.